म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा. वा.
दा. क्र. ९४२

BVBK-0400942

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ....९४२.... दिनांक ......
विषय ..किशोर.. क्र. ..४३९..

# समर्पण

आरंभीं आपल्या 'करपल्लवी' भाषेच्याद्वारें
माझ्याशीं आपली जिगरदोस्ती जमविणारी
आणि ती पक्की जमल्यानंतर
आपल्या 'माथेरानां' त माळावयास लागणारें
एक फूल (FLOWER) माझ्याकडून मिळविण्यासाठीं
गुजराथी 'गरबा' नृत्याच्या नांवाखालीं
आपल्या 'कत्थक' नृत्या(?)च्या पदन्यासाद्वारें
मला पदोपदीं 'फूल' (FOOL) बनविणारी
माझी बालमैत्रीण
कुमारी प्रांजली प्रधान
हिला
साशीर्वाद समर्पण.

सुरेश शर्मा

BVBK-0400942

# सिंधुद्वीप

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र.....      दिनांक
विषय      क्र....

## एक

ही गोष्ट आजच्या काळांतली नसून सुमारें दोनशें वर्षांपूर्वीच्या काळांतली आहे. त्या काळीं आपल्या भारतांत आगबोटी, आगगाड्या किंवा विमानें असलीं प्रवासाला उपयोगी पडणारीं वेगवान वाहनें नव्हतीं.

नाहीं म्हणायला लंकादहनानंतर प्रभु रामचंद्र पुष्पक विमानांतून अयोध्येला परत गेले असल्याचा उल्लेख रामायणांत आहे नि त्यानंतर आमच्या महाराष्ट्रांतले एक सत्पुरुष तुकाराम-महाराज हे जिवंतपणींच विमानांतून वैकुंठाला गेले असल्याचा उल्लेख 'संत तुकाराम' नाटकांत आहे. खरें खोटें देव जाणे किंवा त्यांचा छळ करणारा रामेश्वर भट जाणे ! कदाचित त्यांना इंद्रायणींत जलसमाधीहि मिळाली असेल...!

पण हल्लीं मात्र विमानांतून वायुवेगानें प्रवास करतां येतो. दिल्लींतल्या अशोक हॉटेलांत पहांटेला चहा घ्याल्यावर विमानांत बसायचें नि दुपारचें जेवण लंडन शहरांत घ्यायचें, इतका जलद प्रवास आज आपल्याला करतां येतो.

जलप्रवास नि स्थलप्रवास यांच्या बाबतींतहि त अशीच परिस्थिति होती ! आगगाड्या किंवा मोटारी हीं त आपल्या देशांत नव्हतीं नि आगबोटीहि नव्हत्या. सागरी करायचा झाला तर तो वल्हय़ांच्या किंवा शिडांच्या स चालणाऱ्या मोठ्या गलबतांतून करावा लागे. त्यावेळ अनुकूल असल्यास तीं गलबतें पुढें जात नि वारा प्रतिकू ल्यास तीं कांहीं काळ थांबवून ठेवावीं लागत ! तसेंच अ वादळ सुरू झालें किंवा पाण्यांत लपलेल्या खडकांवर तीं अ तर तीं बुडूनहि जात असत. या सर्व कारणांमुळें त्या काळीं गलबतें शक्य तों किनाऱ्यानें न्यावीं लागत. त्याला आणखी कारण होतें. गलबतें मोठ्या समुद्रांत गेल्यावर त्यांना कुठच्या दिशेकडे जात आहोंत तें कळत नसे; कारण त्य होकायंत्राचा शोध लागला नव्हता.

अशाहि अवस्थेंत त्यावेळीं भारतांतलीं गलबतें दू प्रवास करीत असत. जातांना मौल्यवान कापड, सोनें-चां इत्यादि धातूंचीं सुंदर भांडीं, नाना तऱ्हांच्या हस्तिदंती निरनिराळ्या प्रकारचीं अत्तरें वगैरे माल ब्रह्मदेश, सयाम, जावा, सुमात्रा इत्यादि देशांत विकण्यासाठीं तीं फारच प्रवास करीत. वाटेंत प्रशांत महासागरांत हजारों लहानमो असून त्या बेटांत अजूनहि चंदनाचीं जंगलें आहेत. गलब माल विकल्यावर नि त्या गलबतांत चंदनाचीं लांकडें भर तीं गलबतें भारतांत परत येत असत. त्या लांकडांपासून सुंदर वस्तू, देवादिकांच्या मूर्ति नि तेल हीं तयार केलीं जात नि तीं पुन्हां परदेशांत नेऊन विकलीं जात असत.

असेंच एक ‘ शंकर ’ नांवाचें मोठें गलबत दक्षिण तल्या मच्छलीपट्टण बंदरांतून बाहेर पडलें. त्या गल

लहानमोठे मिळून ऐंशी खलाशी होते अन् त्यांत नाविक विद्येचें शिक्षण घेणारे चार मुलगे होते. त्या चौघांत सुंदरम् हा मुलगा सुमारें अठरा एकोणीस वर्षांचा होता नि नाविक विद्येचें शिक्षण घेतल्याला त्याला चार वर्षें पुरीं झालीं होतीं. बाकीच्या तिघांपैकीं रामप्रसाद हा पंधरा वर्षांचा खलाशी बनारसचा होता, तेरा वर्षांचा मणिभाई हा गुजराथ प्रांतांतला होता नि चंद्रशेखर हा बारा वर्षांचा मुलगा बंगाल प्रांतांतला होता.

ते चौघेहि खलाशी परस्परांचे सच्चे स्नेही होते. ते एक-मेकांशीं एकजुटीनें वागत असत. त्यांचें खाणेंपिणें एकत्र होत असे नि अडीअडचणीच्या वेळीं ते एकमेकांना मदत करीत असत. त्या चौघांत सुंदरम् हा वयानें नि अनुभवानें मोठा असल्यामुळें बाकीचे तिघेहि मुलगे त्याला मान देत असत. त्यानें सांगितलेली सारीं कामें ते बिनतक्रार करीत असत.

त्या काळचा समुद्रप्रवास आतांच्या प्रवासाइतका सहज-सोपा नव्हता. आत्तांच्या आगबोटी वाफेच्या इंजिनावर किंवा डिझेल तेलाच्या इंजिनावर चालतात; पण त्या काळीं तसें नव्हतें. त्या काळचीं गलबतें वल्ह्यांच्या साह्यानें किंवा शिडांच्या साह्यानें चालविलीं जात असत. एखाद्या वेळीं उलट वारा वाहूं लागला तर तीं गलबतें बरेच दिवस समुद्रांत थांबविलीं जात नि अनुकूल वारा वाहूं लागतांच तीं पुढें चालूं लागत. आतांच्यासारखीं होकायंत्रेंहि नव्हतीं त्या काळीं ! आकाशांतले तारे किंवा ग्रह, नक्षत्रें यांच्या साह्यानें दिशा ओळखल्या जात असत !

या एकंदर प्रतिकूल परिस्थितीमुळें त्या काळचीं गलबतें किनाऱ्याकिनाऱ्यानें प्रवास करीत असत. तीं समुद्रांतून प्रवास करूं लागलीं, तरी त्यांना जमीन दिसत असे.

शंकर गलबत जेव्हां मच्छलीपट्टण बंदरांतून बाहेर पडलें,

तेव्हां त्याला आज ज्याला आपण ओरिसा म्हणतों, त्या ईशान्य किनाऱ्यानें जावें लागलें. गंगेच्या हुगळी नस्तांत पोहोंचल्यावर त्यानें आपली दिशा बदलली नि तें ब्रह्मदेशाच्या दक्षिण किनाऱ्यानें जातां जातां तीन महिन्यांनंतर सुमात्रा बेटावर जाऊन पोहोंचलें.

तीन महिन्यांच्या खडतर प्रवासामुळें गलबतावरचे सारे खलाशी थकून गेले होते, कित्येक आजारीहि पडले होते, म्हणून त्या गलबताला एक महिनाभर समुद्रांत नांगर टाकून वरवा करणें भाग पडलें; पण त्या अवधींत गलबतावरच्या खलाशांनीं थोडा-फार व्यापार केला नि गलबताची डागडुजीहि केली. त्यानंतर पुढच्या प्रवासाला लागणारा दाणागोटा नि गोडें पाणी यांचीहि तरतूद केली. त्या चौघांहि शिकावू खलाशांना जावा नि सुमात्रा हीं बेटें अतिशय आवडलीं. तिथल्या निसर्गसौंदर्यानें ते दिपून गेले. जावा बेटांतील बोरीबदर मंदिर तर त्यांना फारच पसंत पडलें.

एक महिन्याच्या सुस्ताव्यानंतर शंकर गलबत पूर्वेकडे वळलें. सागरप्रवास भयंकर भीतिदायक होता! आजूबाजूला अनेक बेटें पसरलीं होतीं नि लहानमोठे खडक सागरांत लपून बसले होते! त्यांच्याशीं टक्कर झाल्यावर शंकरला जलसमाधि मिळण्याची भीति होती!

प्रवासांतले चार महिने मोठ्या मजेंत गेले होते; पण पुढचा प्रवास फारच त्रासदायक होता! तें गलबत ज्या भागांतून प्रवास करणार होतें, तो भाग भूमध्य रेषेच्या निकट होता! तिथला वारा अचानक थांबत असे नि उकाड्यामुळें जीव गुदमरून जात असे! कधीं कधीं मुसळधार पावसामुळें खलाशांच्या अंगांत हुड-हुडीहि भरत असे!

अन् एक दिवशीं असेंच घडलें! सारे खलाशी हैराण होऊन गेले! लागोपाठ तीन दिवस वारा साफ बंद पडला. आकाश

निरभ्र होतें नि चांदण्याहि चमकत होत्या; पण उकाडा इतका वाढला होता, कीं खलाशांनीं आपल्या अंगांतले कपडे काढले होते तरीहि घामामुळें त्यांचीं अंगें ओलींचिंब होऊन गेलीं होतीं! ते तहानेनें व्याकुळ झाले होते नि त्यांची अन्नावरची वासना उडून गेली होती! वारा थांबल्यामुळें गलबताचीं शिडेंहि ढिलीं पडलीं होतीं!

रात्र काळोखी होती. रामप्रसाद पाळीप्रमाणें पहारा करीत होता. अचानक त्याची नजर ईशान्य दिशेकडे गेली. आकाशांत इतर चोहोंकडे चांदण्या चमकत होत्या; तथापि ईशान्य दिशे-कडच्या भागांत मात्र एकहि चांदणी चमकत नसल्याचें त्याला दिसलें. तसें होण्याचें कारण कळलें नाहीं त्याला; पण तो धांवत गलबताच्या कप्तानापाशीं गेला. कप्तान डाराडूर झोंपला होता. रामप्रसादानें त्याला ढळविल्यावर तो डोळे चोळीत उठला त्यानें आकाशाकडे आपली नजर वळविली. पुढचें संकट त्याच्या डोळ्यां-पुढें उभें राहिलें!

'सार्‍या खलाशांना बोलावून आण इथें!' कप्तान राम-प्रसादाच्या अंगावर ओरडून म्हणाला, 'आतां फार मोठें वादळ सुरू होणार!'

हां हां म्हणतां गलबतावरचे सारे खलाशी कप्तानासमोर यऊन उभे राहिले.

'सारीं शिडें नीट गुंडाळा.' कप्तान त्यांना हुकमी स्वरांत सांगूं लागला. 'ज्या महत्वाच्या वस्तु गलबतांत इकडे तिकडे विखुरल्या आहेत, त्या गलबताच्या आंतील लोखंडी कड्यांना घट्ट बांधा. गलबतांतला दाणागोटा नि प्यायचें गोडें पाणी हीं नीट झांकूनपाकून ठेवा. गलबतावरची होडीहि दोरखंडानें घट्ट बांधून ठेवा!'

कप्तान आपल्या कामांत कुशल असल्याकारणानें सारे खलाशी त्याला मान देत असत. त्याच्या आज्ञेनुसार लगेच ते आपापल्या कामाला जुंपले.

पण तितक्यांतच आकाश ढगांनीं झांकळून गेलें. साऱ्या चांदण्या गडप झाल्या.

त्या वेळेपर्यंत जो समुद्र शांत होता, तो त्यानंतर भयंकरच खवळला. पहाडासारख्या लाटा उसळूं लागल्या नि त्यांच्या थपडांमुळें शंकर गलबत डळमळूं लागलें.

तितक्यांतच आकाशांत वीज चमकली नि नंतर मुसळधार पाऊस पडूं लागला. त्या गलबतांत पावसाचें पाणी भरत होतें नि लाटांच्या माऱ्यामुळें तें गलबत वरखालीं होत होतें. क्षणार्धांत तें बुडणार अशी सर्वांना भीति वाटत होती. कप्तान गडबडून गेला होता.

ती सारी रात्र नि रात्रीनंतरचा दुसरा सारा दिवस तसाच प्रकार चालूं होता. जे खलाशी थोडेसे सावध होते, ते गलबतांतली कोणती ना कोणतीतरी वस्तु आपापल्या हातांत घट्ट धरून गलबतांत जिकडेतिकडे स्वस्थ पडले होते. त्यांच्यांतले गलबतांत कोण आहेत नि समुद्रांत कोण बुडाले हें कुणालाच कळत नव्हतें. हालचाल करतां येणें अशक्य झाल्यानें त्यांच्या पोटांत घांसभर अन्न किंवा घोंटभर पाणीहि पडलें नव्हतें.

गटंगळ्या खात असलेलें तें गलबत समुद्रांतून कुठच्या दिशेकडे जात होतें, तेंहि कळायला कांहींच मार्ग नव्हता ! कारण चोहोंकडे दाट काळोख. सूर्यहि दिसत नव्हता नि चांदण्याहि चमकत नव्हत्या. नाहीं म्हणायला मध्येंच केव्हांतरी वीज चमकत असे नि तेवढ्या अल्पावधींत एखादा खलाशी दुसऱ्या एखाद्या

खलाशाला धुंडाळण्याचा प्रयत्न करी; तथापि त्याचा तो प्रयत्न सफल होत नसे.

चंद्रशेखर, रामप्रसाद, मणिभाई नि सुंदरम् या चौघां खलाशांनीं आपापल्या कंबरेला घट्ट आवळून बांधलेल्या दोरखंडांचीं टोंकें गलबताच्या सुकाणाला अडकविलीं होतीं, म्हणून ते पावसाच्या पाण्यांत भिजत असले, तरी ते समुद्राच्या पाण्यांतून वहात जाण्याची फारशी भीति नव्हती !

दिवस संपला नि रात्र सुरू झाली. वादळ थांबण्याचें कोणतेंच चिन्ह दिसत नव्हतें. वेळेचाहि अंदाज कळत नव्हता. गलबतांतल्या सार्‍या लोकांनीं जगण्याची आशा सोडली होती ! !

किती रात्र झाली होती कुणास ठाऊक; पण त्यावेळीं गलबताचें सुकाणू कशाशींतरी घांसलें जात असल्याचा भास होत होता.

'बाळांनो, तुम्ही आपल्या कंबरांना बांधलेल्या दोरखंडांचीं टोकें गलबताच्या सुकाणाला अडकविलीं होतीं, तें आतांपर्यंत योग्य होतें; पण हें गलबत खडकांमधून जात असल्यानें केव्हां कुठल्या खडकाला आपटेल नि बुडून जाईल तें सांगतां येत नाहीं. त्यासाठीं आपापल्या कंबरेचे दोरखंड सोडून टाका !' गलबताचा कप्तान कुठूनसा आला नि त्या चौघांहि शिकाऊ खलाशांना म्हणाला.

त्या चौघांचेहि हातपाय बधिर झाले होते, म्हणून स्वतः कप्तानानेंच त्यांना बंधनांतून मुक्त केलें नि त्यांचा जिथें वार्‍या-वादळापासून थोडासा बचाव होण्यासारखा होता, अशा जागीं त्यांना नेऊन सोडलें !

तितक्यांत तें गलबत समुद्रांतल्या खडकाला जोरानें आदळलें नि त्याचें सुकाणू मोडून एका बाजूस पडल्याचें त्या चौघांहि

खलाशांनीं पाहिलें. सुकाणाच्या खालीं कुणीतरी एक माणूस दबला गेला आहे असेंहि त्यांना दिसलें.

तें गलबत आतां पुढें पुढें जात नव्हतें. कदाचित तें खडकांत अडकलें देखील असेल. समुद्राच्या लाटा त्याच्यावर जोरानें आदळत होत्या.

गलबतावरचीं माणसें इकडे तिकडे धांवत पळत होतीं. कांहीं माणसें त्याच्यावर असलेली होडी समुद्रांत सोडण्याचा प्रयत्न करीत होतीं.

त्या चौघांहि शिकावू खलाशांनीं मोडून पडलेल्या सुकाणापाशीं जाऊन पाहिलें, तेव्हां सुकाणाखालीं दबलेली ती व्यक्ति दुसरी तिसरी कुणी नव्हती, तर तो त्या गलबताचा कप्तान होता असें त्यांना दिसून आलें !



'बाळांनो,' तो कप्तान त्यांना म्हणाला, 'मी सुकाणाखालीं चेंगरल्यामुळें मला फार मोठी जखम झाली असून, मी वांचेन अशी मला आशा वाटत नाहीं ! गलबतावरची होडी जर समुद्रांत सोडली गेली असती, तर त्या होडींत उतरून तुम्हांला

तुमचे जीव वांचवितां आले असते; पण...' तितक्यांत वीज चमकली. प्रकाश पडला !

होडी समुद्रांत सोडली गेली असून, कांहीं खलाशी त्या होडींत उतरण्याचा प्रयत्न करीत असल्याचें त्या चौघांहि शिकावू खलाशांना दिसलें त्या प्रकाशांत !

'कप्तानसाहेब, आम्हीं तुम्हांला त्या होडींत उतरवितों.' मणिभाई कप्तानाला म्हणाला.

'नको !' कप्तान आपला नकारार्थी हात हलवून त्यांना म्हणाला, 'तुम्ही जा नि त्या होडींत उतरा.'

पण तितक्यांत एक पर्वतप्राय लाट त्या गलबतावर आदळल्यानें तें गलबत नाहीं नि ती होडीहि नाहीं, आपण दोघे समुद्रांत पोहत आहोंत असें चंद्रशेखर अन् सुंदरम् यांना दिसून आलें ! ते दोघे समुद्राच्या अक्राळविक्राळ लाटांशीं झुंजत होते.

चंद्रशेखर नि सुंदरम् हे दोघेहि पट्टीचे पोहणारे होते; पण जमीन कुठेंशी आहे तें जर त्यांना कळलें असतें, तर तें पोहणें त्यांच्या कामीं आलें असतें ! अखेरीस दोघेहि आपल्या नशिबावर हवाला ठेवून समुद्रांत पोहूं लागले !

'रामप्रसाद तर तासचे तास पोहतो.' सुंदरम् चंद्रशेखरला सांगूं लागला, 'पण बिचारा मणिभाई पाण्यांत पाऊल टाकायला भितो ! त्याची काय अवस्था झाली असेल तें देवालाच ठाऊक !'

'तो वांचण्याची कांहीं आशा नाहीं !' चंद्रशेखर म्हणाला, 'अन् आम्ही दोघेहि थोडेच वांचणार आहोंत !'

'अरेच्या ! हें काय ?' सुंदरम् ओरडला, 'माझे पाय जमिनीला लागले ! अरे, इकडे पोहत ये चंद्रशेखर.'

थोड्याच वेळांत ते दोघेहि कंबरेइतक्या पाण्यांतून पुढें पुढें जाऊं लागले. किनाऱ्याकडे जाणाऱ्या लाटा त्यांना पुढें नेत होत्या

नि किनाऱ्याकडून परतणाऱ्या त्याच लाटा त्यांना पुन्हां मागें खेचीत होत्या !

'धीर सोडूं नकोस चंद्रशेखर!' सुंदरम्‌नें त्याचा हात पकडला नि तो त्याला म्हणाला, 'समोर किनारा असून, त्या किनाऱ्यावर झाडें आहेत, असें आतां विजेच्या प्रकाशांत मला दिसलें...'

अन् ती गोष्ट खरी होती. पडतझडत, आदळत आपटत, ते दोघेहि तासाभरांत समुद्राच्या किनाऱ्यावर जाऊन पोहोंचले !

✦ ✦

# दोन

सुंदरम्‌नें सकाळींच जेव्हां कुणाच्यातरी हुंदक्यांचा आवाज ऐकला, तेव्हां तो जागा झाला नि आपण समुद्रकिनाऱ्यावरच्या वाळूंत झोंपलों आहों असें त्याला दिसल्यानें तो आश्चर्यचकित झाला. तहान, भूक नि बराच वेळ समुद्राच्या पाण्यांत पोहत राहिल्यानें आलेला थकवा, या तीन कारणांमुळें किनाऱ्यावरच्या रेतींत तो गाढ झोंपला होता.

त्याच्या बाजूला बसलेला चंद्रशेखर स्फुंदून स्फुंदून रडत होता.

'काय सुंदरम्‌दादा,' चंद्रशेखर हुंदके देतां देतां म्हणाला, 'रामप्रसाद नि मणिभाई या दोघांना समुद्रांतल्या माशांनीं गिळूनहि टाकलें असेल.'

'काय करायचें शेखरभाई!' सुंदरम् त्याला म्हणाला, 'अन् आमचें तरी काय? आम्ही आमच्या प्रयत्नांमुळें थोडेच वांचलों आहोंत?'

'जरा ऊठ नि इथली जागा कशी काय आहे तें पहा. बाकी इथें जंगली जनावरें दिसत नसल्यानें त्यांची भीति नाहीं म्हणा; पण थोडेंफार खायला-प्यायला मिळालें नाहीं, तर तहाने-भुकेमुळें आम्हांला इथेंच मरावें लागेल!' सुंदरम् पुन्हां म्हणाला.

थकव्यामुळें दोघेहि मलूल पडले होते. त्यांचे हातपाय गळून गले होते.

सुंदरम् पुढें म्हणाला, 'आणखीन् असें पहा, हवा स्वच्छ आहे. जणु वादळ सुरू झालेंच नव्हतें! या उन्हांत आमच्या अंगावरचे कपडे झटकन् वाळतील.'

ते दोघेहि समुद्रकिनाऱ्यावरच्या पुळणींतून पुढें पुढें चालत जाऊं लागले. सारें वातावरण शांत असल्याकारणानें त्यांच्या पुळणीवर पडणाऱ्या पावलांचा आवाज स्पष्ट ऐकूं येत होता. समुद्राच्या पूर्वेकडील भागांत किनाऱ्यापासून सुमारें पन्नास-पाऊणशें यार्डपर्यंत वाळू होती नि या रेताड जमिनीच्या पुढें बागायती जमीन होती. त्या बागायती जमिनीच्या पट्टयांत हजारों माड होते नि त्या माडांच्या पुढें जंगल होतें. त्या जंगलांत असंख्य रंगीबेरंगी पांखरें इकडून तिकडे उडत होतीं.

भुसभुशीत रेताड जमीन ओलांडल्यावर त्या दोघांना गुडघा-भर पाण्यांतून पुढें जावें लागलें. त्या पाण्यांत लहानमोठे खडक होते नि त्यांतल्या एका खडकावर एका पायाचें जुतें पडलें होतें.

ते दोघेहि तें जुतें मोठ्या कुतूहलानें पाहूं लागले.

'हें जुतें शंकर गलबतावरच्या एखाद्या खलाशाचें आहे.' चंद्रशेखर म्हणाला.

'खात्रीनें. कारण याची बनावट मच्छलीपट्टणांतल्या जुत्या-सारखी आहे.' सुंदरम्नें चंद्रशेखरच्या सांगण्याला दुजोरा दिला.

'पण आम्हांला याचा काय उपयोग? हें निरुपयोगी आहे.

आधींच हें एका पायाचें नि त्यांतहि आपच्या पावलांपेक्षां मोठ्या आकाराचें.'

त्यावर सुंदरम्नें त्याला एक सुंदर सुभाषित ऐकविलें. तो म्हणाला—

'अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् ।
अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ॥

'असें बोलूं नकोस चंद्रशेखर! या दुनियेंत अयोग्य किंवा टाकाऊ असें कांहीच नाहीं! फक्त त्याची योग्य योजना करणारा माणूसच विरळा! हें जुतें मी माझ्यापाशीं ठेवतों. कोणत्या वेळीं याचा काय उपयोग होईल तें सांगतां नाहीं यायचें!'

त्यानंतर सुमारें अर्धे फर्लांग पुढें चालून गेल्यावर त्यांना पाण्यांत कांहींतरी पडलें असून, त्याच्याभोंवतीं समुद्रांतलीं पाण-किरीं घिरट्या घालीत असल्याचें दिसलें. त्या दोघांच्या अंगांत अवसान कुठून आलें कुणास ठाऊक; पण ते दोघेहि जमिनीवर काय पडलें आहे तें पहाण्यासाठीं तिथपर्यंत धांवत गेले अन् त्यांनीं जेव्हां तें पाहिलें, तेव्हां त्यांना अतिशय आनंद झाला नि अतिशय दुःखहि झालें!

त्या दोघांना तिथवर कंबरेइतक्या पाण्यातून जावें लागलें होतें. रामप्रसादनें मणिभाईला आपल्या पाठीशीं टॉवेलानें घट्ट बांधलें होतें.

'हाय रे रामप्रसाद! हाय रे मणिभाई! तुम्हां दोघांचा अंत अशा प्रकारें व्हावा ना!' चंद्रशेखर नि सुंदरम् हे दोघेहि रडूं लागले.

त्या दोघांनीं रामप्रसाद नि मणिभाई यांचे देह उचलले नि ते कोरड्या वाळूवर नेऊन ठेवले. त्यानंतर त्यांच्याभोंवतीं जो टॉवेल बांधला होता, त्याची गांठ सोडून तो बाजूला ठेवला. तेवढें

केल्यावर त्यांनीं रामप्रसाद नि मणिभाई यांचे देह वाळूवर अलग अलग ठेवले नि ते दोघेहि हताश होऊन त्यांच्या देहापाशीं बसले. त्यावेळीं ते दोघेहि आपली तहानभूक विसरले होते.

'अरे, हें काय?' सुंदरम् ओरडला, 'मणिभाईनें आपले डोळे उघडले! हा जिवंत आहे कीं काय?'

त्या दोघांचेंहि निरीक्षण केल्यावर नि त्या प्रत्येकाच्या छातीवर हात ठेवून पाहिल्यावर रामप्रसाद नि मणिभाई यांचीं काळजें धडधडत असल्याचें त्यांना दिसलें.

'काय करावें कळत नाहीं!' सुंदरम् आपल्या कपाळावर हात ठेवून म्हणाला, 'यावेळीं या दोघांना दूध किंवा दुसरें कसलें तरी पेय पाजणें जरूर आहे; पण दूध किंवा दुसरें कोणतेंतरी पेय हीं आणायचीं कुठून?'

अचानक चंद्रशेखर उठला नि जंगलाच्या दिशेनें धांवत सुटला. थोड्याच वेळांत तो दोन कोवळीं शहाळीं घेऊन परत आला.

'शाबास! छान झालें; पण हीं पाडलींस कशीं?' सुंदरम्‌नें विचारलें

'मीं पाडलीं नाहींत, पडलीं होतीं जमिनीवर.' चंद्रशेखरानें सांगितलें.

'कदाचित वादळामुळें माडावरून गळून पडलीं असतील.' सुंदरम् म्हणाला' 'पण हीं फोडायचीं कशीं?'

उत्तरादाखल चंद्रशेखरानें आपल्या खिशांतून एक मोडका चाकू बाहेर काढला नि त्याच्या पात्यानें त्या दोन्ही शहाळ्यांना भोकें पाडलीं. त्यानंतर त्यानें वाळूंत पडलेली एक शिंप उचलली नि तिच्यांत थोडेंथोडें शहाळ्याचें पाणी भरून तें तो आपल्या बेशुद्ध मित्रांना पाजूं लागला.

सुमारें तासाभरांत ते दोघेहि सावध झाले.

'मी कुठें आहें ?' मणिभाईनें विचारलें.

चंद्रशेखर नि सुंदरम् हे दोघेहि खूष झाले.

पूर्वी ते तहानभूक विसरले होते; पण आतां त्यांना त्यांची जाणीव झाली.



चंद्रशेखर धांवत गेला नि त्यानें वादळामुळें माडांवरून खालीं गळून पडलेलीं बरींचशीं कोवळीं शहाळीं आणलीं. त्यांच्यांतलें गोड पाणी प्याल्यावर त्या दोघांनाहि अतिशय आनंद झाला. त्यानंतर त्यांनीं तीं दगडांवर आपटून फोडलीं नि त्यांच्यांतल्या कोवळ्या लुसलुशीत खोबऱ्यावर आपापली भूक भागविली.

सुमारें दोन तासांनंतर रामप्रसाद नि मणिभाई हे चांगलेच सावध झाले. समुद्रकिनाऱ्यावरची वाळू तापली होती, म्हणून ते चौघेहि स्नेही जवळच्या जंगलांत गेले नि एका झाडाच्या थंड सावलींत बसले.

नंतर सुंदरम् त्या तिघां स्नेह्यांना म्हणाला, 'हें पहा, दैवयोगानें आपण आज चौघेहि जिवंत आहोंत. मणिभाईचें जिवंत

रहाणें हें रामप्रसादच्या प्रयत्नांचें फल आहे. त्याला पोहतां येत नाहीं अन् रामप्रसादनें जर त्याला आपल्या पाठीशीं घट्ट बांधलें नसतें, तर तो वांचलाच नसता मुळीं ! शंकर गलवत तर बुडूनच गेलें; पण त्याच्यावरचे किती खलाशी समुद्रांत वाहून गेले नि होडींत बसल्यामुळें किती बचावले तें आम्हांला कळणें अशक्य असलें, तरी होडींत बसलेले खलाशी आमच्याप्रमाणेंच इथें ना दुसरीकडे कुठेंतरी समुद्रकांठीं उतरले असणें संभवनीय आहे. आतां आपण ज्या जमिनीवर उतरलों आहोंत, तो भूप्रदेश मोठा आहे कीं तें एक लहानसें बेट आहे तें आपण पाहिलें पाहिजे. तसेंच इथें कोणी नरभक्षी लोक आहेत कीं काय तें आपण पाहिलें पाहिजे. आपण तसें न केल्यास आम्ही पुन्हां संकटांत सांपडूं ! खाण्या-पिण्याचीहि कांहींतरी व्यवस्था केली पाहिजे. नारळांचें खोबरें खाऊन आपण किती दिवस काढूं ? थंडी, ऊन, वारा, पाऊस, जंगली जनावरें इत्यादिकांपासून आपला बचाव करण्यासाठीं आपल्याला एखादें लहानसें झोंपडें बांधावें लागेल. त्यासाठीं आपण चौघेहि कांहींतरी उपाय शोधूंया नि एकजुटीनें कामाला लागूंया ! न जाणो, एखादें गलबत इकडून जातांना दिसलें, तर आम्हाला आमच्या घरींहि जातां येईल !'

'पण आपल्यापाशीं कोणकोणत्या वस्तु आहेत तें आपण अगोदर पाहिलें पाहिजे.' चंद्रशेखरनें सुचविलें.

'तुझें म्हणणें योग्य आहे. या पहा वस्तु !' असें म्हणून सुंदरम्नें आपल्या खिशांतून एक मोठी चावी, सरासरी दोन वार लांबीची जाड दोरी, शीड शिवण्याची एक मोठी सुई अन् एक फुटकी बाटली, एवढ्या वस्तु बाहेर काढल्या नि त्या बाकीच्या तिघां स्नेह्यांच्या पुढ्यांत ठेवल्यावर तो त्यांना म्हणाला, 'यांच्या-शिवाय माझ्या अंगांत असलेलें एक कुडतें, एक बंडी, एक मांड-

चोळणा नि झिजलेला एक जुत्याचा जोड, इतक्या वस्तु माझ्या-पाशीं आहेत यावेळीं !'

तेवढ्या वेळांत चंद्रशेखरनें आपल्यापाशीं असलेल्या वस्तु बाहेर काढल्या नि त्या आपल्या तिघां स्नेह्यांपुढें ठेवल्या. त्या वस्तूंत मूठ मोडलेला एक चाकू, मूठ नसलेली एक लोखंडी हातोडी नि तागी सुतळीची एक मध्यम आकाराची गुंडी एवढ्या वस्तु होत्या.

'माझ्या अंगांत एक कुडतें आहे नि एक पायजमा आहे. जुत्याचा जोडहि आहे एक. समुद्रांत बुडतां बुडतां शिडाचा एक तुकडा फाडून तो मीं माझ्या कंबरेला बांधला होता! बस्. माझ्यापाशीं एवढ्याच जिनसा आहेत !' चंद्रशेखर म्हणाला.

रामप्रसाद झाडाखालीं आडवा पडून विश्रांति घेत होता, तो उठून बसला अन् म्हणाला, 'कुडतें माझ्याहि अंगांत आहे. बंडी नि बनियानहि आहे. कमरेभोंवतीं एक टॉवेल गुंडाळला होता; पण त्या टॉवेलानें मीं मणीला माझ्या पाठीशीं बांधलें. माझें नि मणीचें अशीं दोघांचीं जुतींहि त्यांतच बांधलीं. माझ्या-पाशीं एवढ्याच वस्तु आहेत !'

मणिभाई फारच थकला होता. तो उठूं लागल्याचें पहा-तांच बाकीच्यांनीं त्याला मनाई केली. मणीनें आपल्या खिशांतून एक हातरुमाल बाहेर काढला. त्याच्या एका शेवांत चष्म्याची एक कांच बांधली होती. एक डबी होती नि तिच्यांत मासे गरव-ण्याचे चार गळ होते. गंजलेले दोन लोखंडाचे लहान लहान तुकडे होते.

मणि हंसत हंसत म्हणाला, 'हा कांचेचा तुकडा माझ्या वयोवृद्ध वडिलांच्या चष्म्याचा आहे; पण या ओसाड जागेंत याचा काय उपयोग होणार ?'

त्यावर सुंदरम् म्हणाला, ‘ आमच्यापाशीं ज्या वस्तु आहेत, त्या सर्व वस्तूंत ही वस्तु कमी किमतीची आहे असें समजूं नकोस मणि !’

‘ या निर्जन बेटांत राहून राहून आम्ही म्हातारे झाल्यावर हा चष्मा आमच्या उपयोगी पडेल !’ मणि हंसत हंसत म्हणाला.

‘ दे ती कांच माझ्याकडे !’ चष्म्याची कांच हातांत घेतल्या-वर उन्हांत जातां जातां सुंदरम् म्हणाला, ‘ जरा धीर धर नि या कांचेपासून काय निर्माण होतें तें पहा !’

सुंदरम्नें वाळलेला पाचोळा जमा केला नि त्याच्यावर कांचेचा किरण टाकला. पहातां पहातां त्या पाचोळ्यांतून धूर बाहेर पडूं लागला.

‘ आम्हांला आगीची अतिशय अडचण होती; पण या कांचेच्या तुकड्यानें आमचें काम भागविलें ! आहे ना ही कांच अमोलिक ?’ सुंदरम्नें सर्वांना विचारलें.

✦ ✦

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ....१४२... दिनांक ......
विषय ...किशोर. क्र. : ४३९..

## तीन

'हें पहा रामप्रसाद नि मणिभाई,' सुंदरम् म्हणाला, 'दुपार टळली नि ज्या जागीं आपण आतां आहोंत, ती जागा कशी आहे तें आम्हाला ठाऊक नाहीं. त्यासाठीं तुम्ही दोघेहि इथें रहा नि आमच्या खिशांतून बाहेर काढलेल्या जिनसा सांभाळा. मी चंद्रशेखरला बरोबर नेतों नि इकडची तिकडची परिस्थिति पाहून परत येतों.'

'पण कोणत्या तरी जंगली जनावरांनीं यांच्यावर हल्ला केला तर?' चंद्रशेखरनें सुंदरम्‌ला विचारलें.

'यांच्या रक्षणाची व्यवस्था अगोदर करूं नि नंतर आपण जाऊं.' सुंदरम् म्हणाला.

त्यानतर सुंदरम् नि चंद्रशेखर असे दोघेहि जवळच्या जंगलांत गेले. तिथून अर्ध्या तासांत ते परत आले. येतांना त्यांनीं दोन मोठे दंडुके, बरेचसे वाळलेले टहाळ, वाळलेलें गवत नि वाळलेला पाचोळा हीं हातांतून आणलीं.

'हा घ्या एकेकाला एकेक दंडुका! एखादें लहानमोठें जंगली जनावर आलेंच, तर या दंडुक्यांचा उपयोग करा. कांचेच्या तुकडयानें आग पेटवा, म्हणजे ती आग रात्रीच्या वेळीं जंगली जनावरांपासून तुमचें रक्षण करील!' असें म्हणून ते दोघेहि जंगलांत निघून गेले.

'ती पहा एक टेकडी दिसते आहे दादा! चल, पहिल्या-न्दां आपण त्या टेकडीवर चढूं या, म्हणजे तिच्यावरून दूरच्या प्रदेशाची टेहळणी करतां येईल.' चंद्रशेखर सुंदरम्‌ला म्हणाला.

सुमारें मैलभर चालून गेल्यावर ती टेकडी लागली. ती जवळजवळ दोनशें फूट उंच होती. ते दोघेहि अर्ध्या तासाच्या आंत त्या टेकडीच्या माथ्यावर जाऊन पोहोंचले.

'आम्ही एका लहानशा बेटावर आहोंत.' सुंदरम् आजू-बाजूच्या प्रदेशाचें निरीक्षण केल्यावर चंद्रशेखराला म्हणाला, 'अन् आजूबाजूला दुसरें बेट नाहीं!'

'अन् बेटहि अगदींच लहान आहे!' चंद्रशेखर म्हणाला, 'असेल अंदाजें चारपांच मैलांच्या परीघाचें!'

'अन् तो झरा पहा ना. टेकडीच्या खालीं पन्नास फुटांवर असलेल्या खड्डयांतून खालीं वहात चालला आहे!' सुंदरम् म्हणाला, 'अच्छा, आतां आपण निघूंया, नपेक्षां रात्र होईल आम्हांला.'

'चल, आपण त्या झऱ्याच्या कांठाकांठानेंच जाऊं!' चंद्र-शेखर म्हणाला, 'कारण आपल्याला जिथें झोंपडें बांधायचें आहे, तिथें पाणी अगत्य असलें पाहिजे.'

ते दोघेहि झऱ्याच्या कांठाकांठानें चालूं लागले नि टेकडीच्या पायथ्यापाशीं पोहोंचले. तिथें एक मोठें वडाच्या झाडासारखें कसलें तरी झाड होतें. तिथें जाऊन पोहोंचतांच जवळच्या कांटेरी

झुडपांत कोणतें तरी जंगली जनावर दुसऱ्या जंगली जनावरावर हल्ला करीत आहे किंवा तीं दोघेंहि आपापसांत झुंजत आहेत असें त्यांना वाटल्यानें ते दोघेहि गुपचुप त्याच्याकडे पाहूं लागले. शंकानिवृत्तीसाठीं सुंदरम् जरासा पुढें गेला; पण तो हंसत हंसत चंद्रशेखरपाशीं परत आला.

'अरे चंदू, वाघ नाहीं नि सिंहहि नाहीं.' सुंदरम् सांगूं लागला, 'रानडुकरांचा एक कळप जमीन उकरून पाळेंमुळें खोदून काढीत आहे अन् ते रानडुक्कर आपापसांत लढत आहेत. मी तर भिऊनच गेलों.'

'चल, पाहून येऊं!' जवळच पडलेले दगड उचलून पुढें फेकतां फेकतां सुंदरम् पुन्हां म्हणाला.

ते दोघेहि कांटेरी झुडपांपाशीं जातांच सात आठ लहान मोठे डुक्कर तिथून पळत सुटले! त्या दोघांनीं जवळ जाऊन पाहिलें, तेव्हां त्यांना असीम आनंद झाला.

'अरे, हीं रताळीं आहेत.' चंद्रशेखर म्हणाला, 'चला, खाण्यालायक एक वस्तु मिळाली. चल, बांधून नेऊं थोडींशीं.'

ते दोघेहि तिथून पुढें गेले. त्या डोंगरी झऱ्यानें पुढें लहानशा नदीचें रूप धारण केलें होतें. झऱ्याच्या कांठावर बरीचशी हिरवळ पसरली होती.

'हा झाला आमचा बिछाना!' चंद्रशेखर म्हणाला, 'रात्रीं पुळणीवर थोडेच झोंपणार आम्ही!'

त्या दोघांनीं मिळून लांबलांब काड्यांची हिरवळ उपटली नि तिचा एक मोठा भारा तयार केला. जवळच्या झाडांवर बऱ्याचशा वेली होत्या, त्या त्यांनीं तोडल्या नि त्या वेलींनीं भारा बांधल्यावर तो सुंदरम्नें चंद्रशेखराच्या डोकीवर चढविला!

समुद्रकिनारा आतां नजीक आला होता नि ती लहानशी

नदी त्या समुद्राला मिळाली होती.

'आतां आपण समुद्रकिनाऱ्यानें चाललों, कीं आमच्या मुक्कामीं जाऊन पोहोंचूं.' दोघेहि एकदमच म्हणाले.

ते दोघेहि समुद्रकांठानें पुढें पुढें जाऊं लागले. कांहीं अंतर चालून गेल्यावर त्यांना जमिनीवर पडलेलें एक सुकें झाड दिसलें. कदाचित् तें बऱ्याच वर्षांपूर्वी वादळामुळें तिथें कोसळून पडलें असेल. चाकूच्या साहाय्यानें सुंदरम्‌नें त्या झाडाच्या चार फांद्या छाटल्या नि तो चंद्रशेखराला म्हणाला, 'हे झाले आम्हा चौघां-साठीं चार दंडुके! इथलीं सर्वांत घातकी जनावरें म्हणजे रानडुक्कर! त्यांना बडवायला यांचा उपयोग होईल!'

सूर्यास्त झाला नव्हता; पण त्याचा प्रकाश तासाभरापेक्षां जास्त उरला नव्हता! चालतां चालतां त्या दोघांनीं दिवसा-उजेडीं आपला मुक्काम गांठला! रामप्रसाद नि मणि हे दोघेहि बेचैन बनून तिथें त्यांची वाट पहात बसले होते!

असें असलें तरी ते दोघेहि मध्यंतरींच्या अवधींत स्वस्थ बसले नव्हते. त्यांनीं बरींचशीं वाळलेलीं लांकडें नि वाळलेला पाचोळा हीं एकत्र करून तीन ठिकाणीं शेकोट्या पेटविल्या होत्या.

'हा झाला आमचा बिछाना!' असें म्हणून चंद्रशेखरानें आपल्या डोक्यावरचा भारा खालीं फेंकून दिला!

'आतां राहिलें आमचें भोजन नि हे आमचे दंडुके!' असें म्हणून सुंदरम्‌नें आपल्याजवळ असलेलें रताळ्यांचें गांठोडें खालीं उतरून ठेवलें!

'काय आहे हें?' मणीनें विचारलें.

'अरे, रताळीं खायला मिळालीं नव्हतीं का तुला कधीं? आतां विस्तवावर भाजतों हीं! फारच रुचकर असतात!' रामप्रसाद म्हणाला.



मुलायम हिरवळीच्या बिछान्यावर बसून भाजलेलीं रताळीं खातां खातां नि शहाळ्यांचें पाणी पितां पितां ते चौघेहि स्नेही आपापसांत गप्पागोष्टी करूं लागले. जेव्हां रामप्रसाद नि मणि यांना नदीचा विषय सांगण्यांत आला, तेव्हां ते दोघेहि हरखून गेले. अन् रताळीं मिळविण्याच्या बाबतींत रानडुकरांनीं कशी मदत केली, तें जेव्हां त्यांना सांगण्यांत आलें, तेव्हां ते दोघेहि खदखदां हंसूं लागले !

' हें पहा बाबांनो, अनोळखी ठिकाण नि रात्रीचा मामला,' सुंदरम् म्हणाला, ' रानडुकरांखेरीज दुसरींहि कोणतींतरी जंगली जनावरें असतील इथें; त्यासाठीं मी नि चंद्रशेखर असे दोघे आळीपाळीनें पहारा करतों. शेकोटचा पेटत्या ठेवणेंहि अगत्याचें आहे !'

' तुझें म्हणणें बरोबर नाहीं.' रामप्रसाद म्हणाला, ' आम्ही दोघेहि आतां ताजेतवाने झालों आहोंत. आम्हीहि पहारा करणार. मणिभाई सर्वांत धाकटा असल्यानें पहाऱ्याची पहिली पाळी त्याची !'

त्यानंतर रात्रभर एकेकानें पहारा केला नि पहारेकऱ्या-व्यतिरिक्त बाकी तिघे मोकळ्या अस्मानाखालीं गाढ झोंपले !

भूमी पर्यंक बाहू मृदुलतर उशी चांदवा व्योमकांती ।
चंद्राचा दीप मोठा सममति ललनासंगमीं हर्ष चित्तीं ।।
दासी दाही दिशा या फिरवुनि चवऱ्या घालिती गोड वारा ।
थाटानें भिक्षु ऐशा नृपसम निजतो सोडुनी लोभ सारा ! ।।

अशी राजयोग्याप्रमाणें त्या चौघांहि स्नेह्यांची अवस्था झाली !

✦ ✦

# चार

दुसऱ्या दिवशीं उजाडण्यापूर्वीच सुंदरम्, रामप्रसाद नि मणिभाई हे तिघेजण जागे झाले; पण त्यांना आजूबाजूला चंद्रशेखर दिसला नाहीं !

'कुठें गेला चंद्रशेखर ?' चोहोंकडे न्याहाळल्यावर मणिभाईनें विचारलें.

'अखेरचा पहारा त्याचा होता.' रामप्रसाद म्हणाला.

'अरे तो बघा ! पाण्यांतल्या खडकावर बसून कांहींतरी करतो आहे !' मणीनें त्याच्याकडे बोट दाखविलें नि आपल्या दोघां स्नेह्यांना सांगितलें.

'काय करतो आहेस तिथें चंद्रशेखर ?' सुंदरम्‌नें ओरडून विचारलें.

'मासे पकडतों आहें !' चंद्रशेखर तेवढ्याच मोठ्यानें ओरडून म्हणाला.

'बंगाली बाबू ना तो ? अन् त्यांतहि कायस्थ ! पक्का मासेखाबू !' रामप्रसाद हंसत हंसत म्हणाला.

तिघांनींहि मांडचोळणे चढविले नि ते चंद्रशेखरापाशीं जाऊन पोहोंचले. मधल्या अवधींत चंद्रशेखरानें दोन मोठे मासे पकडले होते !

'शाबास बंगाली बेटचा !' सुंदरम् म्हणाला, 'आतां आस्ते आस्ते आमच्या जेवणाची प्रतिष्ठा वाढूं लागली बरें ! आरंभीं शहाळीं, नंतर रताळीं अन् आतां ही मासळी !'

चौघांनींहि आंघोळ केली नि मासळी घेऊन ते आपल्या मुक्कामीं गेले. शेकोटींतला विस्तव विझाला नव्हता ! त्याच्यावर मासे नि रताळीं भाजण्यांत आलीं ! भाजलेले मासे, भाजलेलीं रताळीं नि आयतीं मिळालेलीं शहाळीं या तीन जिनसांवर त्या चौघां स्नेह्यांनीं हंसत हंसत आपली सकाळची न्याहारी उरकली ! मीठ नव्हतें. नसलें म्हणून काय बिघडलें ? त्या चौघांच्याहि अंगांत पोरवयांतला उत्साह होता नि शिवाय त्यांच्या पोटांत भुकेची होळीहि पेटली होती !

चौघांचीं पोटें भरल्यावर सुंदरम् म्हणाला, 'बाबांनो, या लहानशा बेटावर आम्ही आलों. चोवीस तास काढले कसेबसे ! आमच्यावर देवाची थोडीफार कृपा होती म्हणून आम्ही वांचलों. आमच्या शंकर गलबतावरच्या इतर खलाशांची काय अवस्था झाली असेल कुणास ठाऊक ! न जाणो, त्यांच्यांतले कांहीं खलाशी आमच्याप्रमाणेंच दुसऱ्या एखाद्या बेटावर जाऊन पोहोंचले असतील.

'आपण या बेटावर जिवंतपणीं आलोंत खरे; पण इथें आम्हांला किती काळ काढावा लागेल तें कसें सांगतां येणार ? कदाचित आमचें अवघें आयुष्यहि इथें जाईल. जेव्हां एखादें चुकलें-माकलें गलबत या बेटाजवळून जाईल, तेव्हां आमची इथून सुटका.

'ज्याअर्थीं आम्हांला अनिश्चित कालापर्यंत इथें रहायचें

आहे, त्याअर्थी आपण आपलीं सारीं कामें समजदारीनें पार पाडलीं पाहिजेत. त्यासाठीं आमच्यांतल्या कुणातरी एकाची पुढारी म्हणून निवड केली पाहिजे नि त्याची आज्ञा बाकीच्या तिघांनीं पाळली पाहिजे. दुसरें महत्त्वाचें काम म्हणजे या बेटावर हिंडून फिरून आमचे दुसरे कोणी साथीदार इथें आले आहेत कीं नाही, इथें नरभक्षी लोक रहातात कीं काय, भयानक अशीं जंगली जनावरें इथें रहातात कीं काय तें सारें शोधून काढलें पाहिजे. त्याशिवाय आम्हांला उपयोगी पडतील अशा कोणकोणत्या वस्तु इथें मिळण्यासारख्या आहेत नि आपण आपलें झोंपडें कोणत्या जागीं बांधायचें, त्याचाहि विचार झाला पाहिजे.'

सुंदरम् आणखीनहि कांहींतरी बोलणार होता; पण चंद्रशेखरानें त्याचें बोलणें मध्येंच थांबविलें नि तो म्हणाला, 'पुढाऱ्यासंबंधींचा प्रश्न सुंदरम्शिवाय सुटणें कठीण. दुसऱ्या कुणाच्या नांवाचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. काय मणिभाई ? काय रामभाऊ ?'

'सुंदरम्दादा हाच आमचा पुढारी आहे.' चंदू, मणि नि रामू हे तिघेहि एकदमच म्हणाले.

'आतां राहिली या बेटावरच्या भटकंतीची बात' राम-प्रसाद म्हणाला, 'तेव्हां माझी सूचना अशी आहे कीं, मणिभाई नि सुंदरम्दादा या दोघांनीं उत्तरेकडे जावें नि मी चंदूसह दक्षिण दिशेकडे जातों. अस्तमानापूर्वी आपण परत इथें यायचें.'

सुंदरम्नें ती योजना मान्य केल्यावर उरलेली मासळी नि रताळीं हीं त्यांनीं आपापल्या पोटांत रिचवलीं. त्यानंतर त्या दोन्ही तुकड्या उत्तरदक्षिणेकडे निघून गेल्या.

दुपारपर्यंत त्या बेटावरील चारपांच मैलांची अर्धी परिक्रमा आटोपल्यावर त्या बेटाच्या दुसऱ्या बाजूला दोन्ही तुकड्यांची

परस्परांशीं गांठ पडली. चौघेहि एका दाट झाडींत बसले नि जेवतां जेवतां ते आपापल्या अनुभवांची अदलाबदल करूं लागले.

'आमच्या वांट्याला आलेला समुद्रकिनारा एकदम बेकार आहे. त्याच्यावरचा सारा भाग रेताड आहे. भटकतां भटकतां उपयोगी पडेल अशी एकच वस्तु मिळाली आम्हांला.' एक बोचकें उघडतां उघडतां चंद्रशेखर म्हणाला, 'ही झाली उद्यांच्या जेवणासाठीं मासळी.'

'या बंगाली कायस्थांना स्वप्नांतसुद्धां मासळीच दिसते अन् जातील तिथें पहिल्यानें शोधतील काय, तर मासळी ! पण ही मासळी गळाशिवाय पकडतां आली कशी ?' मणि थोडा वेळ थांबला नि पुन्हां म्हणाला, 'चंदूभाई, रागावूं नकोस हं माझ्यावर. हें सारें थट्टेचें बोलणें. बाकी खरें म्हणजे, माशांचीं निरनिराळीं पक्वान्नें तुम्ही कायस्थांनींच करावीं. त्याबाबतींत आम्हां गुजराथ्यांचें नशीब भुक्कड. आमच्या नशिबीं फक्त डाळ अने रोटलो. अधूनमधून खमणढोकळो. आतां सांग, हे मासे मिळाले कसे तुला ? जातांना गळ होता का तुझ्याबरोबर ?'

चंद्रशेखर म्हणाला, 'इथून थोड्याशा अंतरावरची जमीन कांहींशी खोलगट आहे. भरतीच्या वेळीं त्या जमिनींत समुद्राचें पाणी शिरतें नि त्या पाण्यांतले मासेहि घुसतात त्या जमिनींत. ओहोटीच्या वेळीं ते मासे थोड्याशा पाण्यांत तिथेंच अडकून पडतात. त्या जमिनींत सहज हातांनीं पकडतां येण्यासारखे खूप मासे आहेत. वाटेल तितके पकडावे नि विस्तवावर भाजून खावे.'

त्यावर मणि म्हणाला, 'अरे, त्या खोलगट जमिनीला खाजण असें म्हणतात नि त्या खाजणांतल्या चिखलावर जमणारे मासे चांगलच चवदार असतात म्हणे.'

मणिभाई थोडा वेळ थांबला नि पुन्हां म्हणाला, 'भाई, —

आम्हांला मात्र अत्यंत उपयोगी अशा वस्तु सांपडल्या. तिकडच्या भागांतल्या टेकड्या समुद्राला भिडल्या असून त्या टेकड्यांतला एक मोठा झरा सरळ समुद्रांत घुसला आहे. फारच उत्तम आहे जागा. आम्हांला त्या जागीं आमचें झोंपडें बांधतां आलें असतें, तर मोठी मजा झाली असती !'

'साऱ्यांना उपयोगी पडतील अशा दोन वस्तु मिळाल्या आम्हांला !' सुंदरम् सांगूं लागला, 'या बेटांत कळकाचे भलेमोठे वांसे आहेत. झोंपडें बांधण्याच्या कामीं ते आम्हाला उपयोगीं पड-तील अन् दुसऱ्या वस्तु या घ्या !' असें म्हणून त्यानें आपल्या पाठीवरचें एक बोचकें त्या तिघांपुढें मोकळें केलें. अन् तो त्यांना म्हणाला, 'आमच्या भाषेंत आम्ही यांना बाळबळम् असें म्हणतों !'

'अन् आम्ही आमच्या भाषेंत यांना कदलीफलम् असें म्हणतों !' चंद्रशेखर म्हणाला.

'अरे, हीं तर केळीं आहेत !' रामप्रसाद उड्या मारीत म्हणाला.

'ढ्ढीगभर आहेत. घ्या खाऊन. इथें भरपूर आहेत हीं !' सुंदरम् म्हणाला.

हां हा म्हणतां तीं सारीं केळीं त्या चौघांनीं फस्त करून टाकलीं.

'अच्छा, आमची परिक्रमा पुरी झाली; आतां आपण आमच्या मुक्कामीं जाऊंया.'

ते चौघेहि स्नेही आपल्या मुक्कामाकडे जाऊं लागले.

मधला मार्ग मोठ्या अडचणीचा होता. ते चौघेहि चाल-तांना हैराण झाले. वाटेंत झाडांची गर्दी नि त्या झाडांना जाडजूड वेलींनीं घेराव घातलेला. वेलींच्या जाळ्यांनीं त्यांचा रस्ता रोखून धरला होता.



‘ हीं बेलफळांसारखीं फळें दिसतात ना ? हीं कोणत्या झाडाचीं फळें ?’ मणीनें विचारलें.

‘ अरे, या बेटांतली ही अतिशय उपयोगी वस्तु आहे ! ’ सुंदरम् म्हणाला, ‘ या फळांना रोटीफळें म्हणतात. भूक भागवायला हीं बरीं तोड दहाबारा. खाऊन टाकूया लगेच ! ’

मणीनें तोडलेलीं फळें चौघांनींहि खाऊन टाकलीं नि आपापली भूक भागविली.

पुढें मोठें मैदान होतें नि त्या मैदानांतल्या लहानशा टेकाडावर कांहीं जनावरें इकडून तिकडे उड्या मारीत होतीं.

‘ सुंदरम्‌दादा, तीं बकरीं असावींत असें वाटतें. ’ मणि म्हणाला, ‘ आपण जर बकऱ्या पाळल्या, तर आपल्याला भरपूर दूध प्यायला मिळेल ! ’

‘ धनगराचाच पोर दिसतोस तूं ! मणि, वाकी तुझें म्हणणें बरोबर आहे. आपण अवश्य पाळूं बकऱ्या. ’

‘ अन् या बिया कसल्या पडल्या आहेत इथें ? भरपूर आहेत. ही सारी झाडी या बियांनींच भरली आहे ! ’ चंद्रशेखर ओरडून म्हणाला.

'ओसाड गांवांत एरंड बळी अशी म्हण आहे ना आमच्यांत ? त्या एरंडाच्या बिया आहेत त्या. लहानपणीं मी त्या दाभणांत ओवून पेटवीत असे. त्या मेणवत्त्यांसारख्या पेटतात नि प्रकाश पाडतात. रात्रीच्यावेळीं यांचा उपयोग होईल आम्हांला !'

जवळच एक पक्ष्यांचा कळप होता नि बोरांसारखीं कसलींतरी फळें खात होता.

'ते पोपट असावेत असें वाटतें.' चंद्रशेखर म्हणाला, 'बस्तान बसतांच आपण पाळूं ते.'

सूर्यास्तापूर्वींच ते चौघेहि स्नेही आपल्या मुक्कामावर जाऊन पोहोंचले. त्यांनीं आपल्याजवळच्या साऱ्या वस्तु पुळणींत पुरून ठेवल्या होत्या. फिरायला जातांना त्या बरोबर नेल्या नव्हत्या. त्यांनीं पुरून ठेवलेल्या साऱ्या वस्तु सुरक्षित होत्या.

त्यांनीं पुन्हां शेकोटचा पेटविल्या. त्या पेटल्यावर त्यांनीं रताळीं भाजलीं. रोटीफळेंहि त्याच विस्तवांत टाकलीं त्यांनीं. जराशी आंच लागतांच त्यांना चिरा पडल्या. चाकूच्या मदतीनें त्यांनीं तीं फळें उघडलीं. आंतला गीर चाखून पाहिला. भाकरीसारखीच चव होती त्या गिराची !

'ही मात्र चांगलीच चीज मिळाली दादा !' मणि म्हणाला.

भोजनोत्तर वाळलेल्या पानांच्या बिछान्यावर ते पडले नि झोंपडें कोणत्या ठिकाणीं बांधायचें त्याविषयीं चर्चा करूं लागले; पण तितक्यांत मणि ताडकन उठून बसला नि म्हणाला, 'त्या एरंडाच्या बिया कशा पेटतात तें पहायचें होतें मला. तूं दाखवलें नाहींस सुंदरम्‌दादा !'

'आत्तांच पहा.' असें म्हणून सुंदरम्‌नें त्यांतल्या थोडचाशा बिया शेकोटींत टाकल्या. त्या शेकोटींतून सुरवातीला थोडासा धूर बाहेर पडला नि नंतर जळत असलेल्या कपडचासारखा उग्र

वास आला; तथापि मागाहून त्या शेकोटींतून पिवळ्या ज्वाला बाहेर पडल्या नि चोहोंकडे प्रकाश पसरला. ते चौघेहि स्नेही टाळ्या पिटूं लागले नि टाळ्या पिटतां पिटतां रामप्रसाद ओरडला, 'चला, आतां प्रकाशाचा प्रश्न मिटला !'

त्यानंतर सुंदरम् म्हणाला, 'झोंपडें अशा जागीं बांधायचें, कीं समुद्रांतल्या वादळी वाऱ्यांपासून आपल्याला त्रास होतां कामा नये, समुद्रांतून येत्या-जात्या गलबतांकडे आपल्याला लक्ष ठेवतां आलें पाहिजे अन् या बेटावर आमचा कुणीतरी शत्रु आलाच, तर त्याला आमचें झोंपडें दिसतां कामा नये, म्हणून तें थोडेंसें आडबाजूला बांधायचें.'

बाकीचे तिघेहि त्या बाबतींत आपापली शंका प्रकट करूं लागले नि स्वतःची एकेक कल्पना सुचवू लागले !

'यावेळीं अशा शंकाकुशंका काढीत बसणें निरर्थक आहे !' सुंदरम् म्हणाला, 'उद्यां सकाळीं न्याहरी आटोपल्यावर आपण चौघेहि प्रत्यक्ष जागेवर जाऊं नि योग्य तो निर्णय घेऊं; तोंपर्यंत झोंपडें कसें बांधायचें त्याचा आपण विचार करूंया ! आमच्याकडे विटा, चिरे, चुना, माती इत्यादि घरबांधणीचीं साधनें नाहींत नि खोरें, कुदळ इत्यादि जमीन खोदायचींहि साधनें नाहींत; त्यामुळें आपल्या देशांत असतात, तसलें घर बांधतां यायचें नाहीं आपल्याला !'

'लांकडाचें घर बांधूं आपण.' मणि म्हणाला.

'पण लांकूड तोडायचें चिरायचें कशानें ?' रामप्रसादनें विचारलें.

त्यावर सुंदरम् म्हणाला, 'हें पहा भाई, प्रत्येक प्रदेशांतली परिस्थिति निरनिराळी असते, म्हणून त्या देशांत निरनिराळ्या पद्धतीचीं घरें बांधलीं जातात. महासागरांतल्या या बेटासारख्या

दुसऱ्या बेटांतलीं घरें लांकडी खांब उभारून त्यांच्यावर बांधलीं जातात. जंगली जनावरांपासून घरांतल्या माणसांचा बचाव व्हावा म्हणून तशी योजना केली जाते. लांकडें तोडण्याचिरण्याच्या बाबतींत आम्हांला अडचण आहे, म्हणून कळकाचे वांसे उभे करून त्यांच्यावर आपलें झोंपडें उभारावें नि ते गवतापानांनीं शाकारावें असें माझें मत आहे.'

'पण कळकाचे वांसे तोडायचे झाले, तर त्याला हत्यार हें हवेंच!' रामप्रसादानें अडचण प्रकट केली.

'भाई, अडचणी आहेतच आमच्यापुढें; पण त्यांच्यांतून आपण मार्ग काढला पाहिजे!' सुंदरम् म्हणाला, 'ठीक आहे. झोंपा आतां. पुढें काय करायचें तें उद्यां पहातां येईल! एकेकजण पाळीपाळीनें पहारा करा नि शेकोटया रात्रभर पेटत्याच ठेवा! त्या विझूं देऊं नका!'

## पांच

दुसऱ्या दिवशीं ते चौघेहि मुलगे पहांटेला उठले नि स्नान, न्याहारी इत्यादि कामें पुरीं केल्यावर त्यांनीं सरळ रानाचा रस्ता धरला ! दुपारच्या खाण्याचे पदार्थ त्यांनीं आपल्याबरोबर घेतलेच होते.

एकेक करतां करतां त्यांनीं झोंपडें बांधण्यासाठीं चार जागा पाहिल्या अन् अखेर त्यांनीं मणिभाईची योजना पसंत केली. त्यांनीं झऱ्यापाशीं झोंपडें बांधायचें ठरविलें !

त्या बेटाच्या उत्तर दिशेला एक पूर्व-पश्चिम टेकडी पसरली होती. पश्चिमेकडे तिची उंचाई कमी झाली होती. त्या टेकडीच्या पश्चिमेकडील टोंकावर एक उंचवटा होता. त्या उंचवटयावर सुमारें आठ फूट लांब, तितकीच रुंद नि सहा फूट खोल अशी एक गुंफा होती. त्या गुंफेसमोर जवळजवळ चौकोन बनण्यासारखीं अशीं चार मोठीं झाडें होतीं.

' जवळच मी एक कळकाच्या मोठ्या वांशांचें बेट पाहिलें

आहे. ते वांसे तोडण्याची कल्पना कुणाला सुचत असेल, तर पुढचें काम सोपें होईल !' सुंदरम् म्हणाला.

'मी एक चांगली युक्ति सांगतों.' रामप्रसाद म्हणाला, 'एकानें चष्म्याच्या कांचेनें किरण पाडून विस्तव पेटवायचा नि बाकीच्या तिघांनीं रानांत जाऊन सांपडतील तेवढ्या एरंडाच्या बिया आणायच्या ! जितक्या जास्त सांपडतील तितक्या बऱ्या !'

'रामप्रसादची कल्पना माझ्याहि लक्षांत आली आहे थोडीशी.' सुंदरम् म्हणाला, 'तूं इथें रहा नि विस्तव पेटव. आम्ही तिघे जातों नि एरंडाच्या बिया घेऊन येतों.'

सुमारें दोन तासांनंतर ते तिघेहि बऱ्याचशा बिया घेऊन आले अन् त्यांनीं पाहिलें, तों रामप्रसादनें विस्तव पेटविला असून, काठीच्या साह्यानें तो कळकाच्या बेटापासची जमीन साफसूफ करीत असल्याचें त्यांना दिसलें.

'मी एक अमोलिक वस्तु आणली आहे येतांना.' सुंदरम्नें रामप्रसादला सांगितलें नि दोन फळें त्याच्या पुढ्यांत टाकलीं.

'हीं कशाचीं फळें ?' रामप्रसादनें विचारलें.

'तुझ्या कर्माचीं !' सुंदरम् सांगूं लागला, 'याला तुंबाफळें म्हणतात. हीं फळें खाण्याच्या उपयोगी पडत नसलीं, तरी हीं वाळल्यावर यांची कवटी कठीण होते. वरचा भाग कापून काढला नि आंतला गीर काढून टाकला, कीं याच्यांत पाणी भरून ठेवतां येतें.'

'हां, हां, आतां आलें माझ्या लक्षांत. आमच्या देशांतल्या संन्याशांपाशीं जे कमंडलु असतात, ते याच फळांपासून बनविलेले असतात.' चंद्रशेखर म्हणाला.

सुंदरम् एका बाजूला बसला नि चाकूच्या साह्यानें तुंबाफळाच्या वरच्या भागाची कवटी कापूं लागला अन् रामप्रसादनें सांगितल्यावर मणि नि चंद्रशेखर असे दोघेजण वाळलेला पालापाचोळा जमा करून तो कळकांच्या मुळांशीं रचूं लागले. त्या

पाचोळ्यावर त्यांनीं एरंडाच्या बऱ्याचशा बियाहि पसरून टाकल्या.

'एक गोष्ट रामप्रसादच्या लक्षांत आली नाहीं.' सुंदरम् म्हणाला, 'कळकाचे वांसे जून झालेले असून पक्के वाळलेले आहेत. आगीत सबंध जळून गेले तर ?'

रामप्रसाद लाजला नि आपलें डोकें खाजवूं लागला.



'हे घ्या. दोन कमंडलु तयार आहेत.' सुंदरम् मणीला म्हणाला, 'तूं नि चंद्रशेखर असे दोघेजण झऱ्यावर जा नि या कमंडलूंतून पाणी घेऊन या.'

पाणी आल्यावर पाचोळा पेटविला गेला. पहातां पहातां वांशांचीं मुळें जळूं लागलीं. आगीच्या ज्वाळा उफाळूं लागतांच त्यांच्यावर कमंडलूंतलें पाणी शिपडण्यांत आलें नि आग रोखण्यांत आली. सुंदरम्नें पूर्वीं विचार केला नसता, तर थोड्याच वेळांत त्या बेटावर भयंकर वणवा पसरला असता !

दोन तासांनंतर पाणी शिपडून आग विझविण्यांत आली नि ते चौघेहि मुलगे आपल्या पूर्वींच्या मुक्कामीं जाऊन झोंपले.

अंगातील उत्सुकता नि उतावीळपणा या दोन कारणांमुळें ते चौघेहि मुलगे मोठ्या पहांटेला जागे झाले नि झऱ्यापाशीं जाऊन पोहोंचले. न्याहारी आटोपल्यावर चौघांनीं मिळून एकेक वांसा खालीं झुकवितांच जमिनीवर आडवा पडूं लागला ! म्हणतां

म्हणतां पाऊणशें-ऐंशी वांसे खालीं कोसळले. त्यांच्यांतले सुमारें पन्नास वांसे खूप मोठे, मजबूत नि पक्के वाळलेले असे होते.

'काय मणिभाई ?' रामप्रसादनें हंसत हंसत मणीला विचारलें, 'तुटले का वांसे ?'

'झोंपडें बांधण्याची एक वस्तु पैदा झाली, आतां दुसरीचा प्रश्न सोडविला पाहिजे !' उत्तरादाखल मणिभाई म्हणाला.

'दुसरी वस्तु कोणती ?' रामप्रसादनें विचारलें.

'दोरी.' मणिभाई म्हणाला.

'दोरीला काय तोटा !' चंद्रशेखर म्हणाला, 'वेलींनीं सारें बेट जखडलें आहे !'

'चला तर त्या जमवून आणूं.' सुंदरम् म्हणाला.

चौघेहि मुलगे जंगलांत धांवत गेले. चाकू एकच होता; पण उत्साह भरपूर होता ! तिसऱ्या प्रहरापर्यंत एक भला मोठा भारा झऱ्यानजीक असलेल्या एका पाण्याच्या डबक्यांत भिजण्यासाठीं फेकून देण्यांत आल्यावर ते चौघेहि मुलगे ओरडत ओरडत नि धांवत पळत आपल्या पूर्वीच्या मुक्कामाकडे निघून गेले.

ज्या जागीं त्या मुलांनीं तीन दिवस मुक्काम केला होता, ती जागा सुंदरम्च्या आदेशानुसार त्यांनीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं सोडून दिली.

आपलें पुळणींत पुरून ठेवलेलें सारें सामान त्यांनीं पुळणींतून उकरून काढलें नि त्याच्यासह जिथें त्यांना नवें झोंपडें बांधायचें होतें, त्या झऱ्यापाशीं ते जाऊन पोहोंचले. वाटेनें चालतांना शंकर गलबतावरच्या सगळ्या खलाशांनीं बुडणें, त्यांतल्या चौघांचे जीव वांचणें, त्या निर्जन बेटावर ते पोहोंचणें, त्यानंतर सारेच्या सारे मोठ्या मजेंत असणें नि त्यांची भविष्यकाळीं तिथून सुटका होणें, इत्यादि गोष्टीसंबंधीं ते आपापल्या मनांत विचार करीत होते !

✦ ✦

# सहा

'तुझ्यापाशीं लोखंडाचे दोन तुकडे होते ना मणिभाई, ते कुठें आहेत ?' मणिभाईला सुंदरम्‌नें विचारलें.

'हे घे दादा.' लोखंडाचे तुकडे सुंदरम्‌च्या हातीं देतां देतां मणिभाईनें त्याला विचारलें, 'पण यांचा कोणत्या कामीं उपयोग होणार ?'

'पहात रहा कोणत्या कामीं कसा उपयोग होतो तें !' असें म्हणून त्यानें मूठ नसलेला हातोडीचा तुकडा मागून घेतल्यावर त्याच्यांत लांकडी दांडा बसविला नि हातोडी तयार होतांच लोखंडाचे दोन्ही तुकडे त्या हातोडीनें ठोकून ठोकून त्या तुकड्यां-पासून दोन छिन्न्या बनविल्या.

त्यानंतर त्या चौघांनीं मिळून कळकाचे चार वांसे चार झाडांना अशा रीतीनें बांधले, कीं त्या वांशांपासून एक चौकोनी मंडप तयार झाला. मंडप तयार होतांच त्यांनीं दोन वांशांना छिन्नीच्या साह्यानें भोंकें पाडलीं नि गुंफेला असलेल्या दगडांच्या

निमुळत्या टोंकांत ते दोन्ही वांसे अडकविले तेवढें केल्यावर बाकीचे वांसे वेलींच्या साह्यानें त्या मंडपाच्या वांशांना घट्ट बांधले.

चार दिवसांच्या परिश्रमांद्वारें त्यांनीं झोंपडीवरचें छप्पर नि तिच्या तीन बाजू गवत अन् पानें यांनीं झांकून टाकल्या. चौथ्या बाजूला उंचवटयाचें भिताड नि गुंफा हीं होतीं. गुंफा सामानसुमान ठेवण्याच्या कामीं उपयोगी पडण्यासारखी होती. त्यांनीं एक शिडीहि तयार केली. वर चढून गेल्यावर ती झोंपड्यांत ओढून घ्यायची अशी त्या शिडीची योजना होती. जंगली जनावरांना वर चढतां येऊं नये हा त्यांतला हेतु. अशा प्रकारें चार दिवसांत आठ फूट उंचीचें झोंपडें तयार झालें.

'हा झाला आमचा मंडपेश्वर महाल !' सुंदरम् म्हणाला.

'अन् सुंदरम्दादा झाला या ओसाड बेटाचा महालकरी !' मणि हंसून म्हणाला.

ते चौघेहि मुलगे त्या बेटावर आल्याला तीन आठवडे लोटले होते. त्या अवधींत त्यांनीं एक 'महाल' बांधला होता. तिथें पाण्याची सोय होती नि एखादें चुकलें माकलें गलबत समुद्रांतून जाऊं लागलें, तर तिथून निसटतां येण्यासाठीं त्याची टेहळणीहि करतां येत होती. एकंदरींत साऱ्या सुखसोई होत्या.

त्याशिवाय पाणी भरून ठेवण्यासाठीं त्यांनीं तुंबाफळांपासून बरेचसे कमंडलु बनविले होते नि शहाळीं, रताळीं, मासळी, केळीं इत्यादि पदार्थांवर त्यांना आपली भूकहि भागवितां येत होती.

अशीच एक दिवशींची गोष्ट. त्यांच्या झोंपडीपासून जवळच असलेल्या समुद्रांत ते चौघेहि मुलगे स्नान करीत होते. त्यांना त्यावेळीं मोठी मजा वाटत होती. मणि पाण्याला भीत असे; पण त्याला प्रसंगीं पाण्यांत पोहतां यावें म्हणून बाकीचे तिघेजण त्याला पोहायला शिकवीत असत. कांहीं दिवसांत त्याला थोडेंसें पोहतां

येऊं लागलें होतें, म्हणून त्या दिवशीं तो त्या तिघांसोबत समुद्रांत दूरवर पोहत गेला होता.

पोहतां पोहतां तिकोनी पंख असलेला नि करड्या रंगाचा कोणतातरी जलचर प्राणी मणीच्या दिशेनें धांवत येत असल्याचें चंद्रशेखरानें पाहिलें.



'शार्क, दादा, शार्क !' चंद्रशेखर ओरडला.

पहिल्यानें सुंदरम्च्या कांहीं लक्षांत आलें नाहीं; पण त्या प्राण्याकडे त्याचें लक्ष गेल्याबरोबर मणि केवढ्या मोठ्या संकटांत सांपडला होता तें त्याला कळलें. समुद्रांतला महाभयंकर असा शार्क मासा मणीच्या अगदीं जवळ जाऊन पोहोंचला होता !

'मणि ! मणि ! किनाऱ्याकडे वेगानें पोहत जा !' चंद्रशेखर ओरडून म्हणाला, 'जलदी कर ! जलदी कर !'

मणि वयानें लहान होता खरा; पण कित्येक दिवस त्यानें समुद्रांतून प्रवास केला होता, म्हणून शार्क मासा किती भयंकर असतो तें त्याला ठाऊक होतें. पोहण्याच्या बाबतींत तो थोडासा कच्चाच होता; त्यामुळें त्याचे हातपाय अधिकच आंखडले गेले !

चंद्रशेखरानें तर मणीबद्दलची आशाच सोडली होती नि तो थरथर कांपत होता; पण रामप्रसाद नि सुंदरम् या दोघांनीं मात्र मुळींच धीर सोडला नाहीं. ते दोघेहि मोठ्यानें ओरडत नि पाणी

कापीत मणीपासून पन्नास फुटांपर्यंत पोहून गेले. त्या शार्क माशाचें लक्ष दुसरीकडे वेधावें हा त्या दोघांचा हेतु होता नि त्यांचा हेतु सफलहि झाला. शार्क मासा रामप्रसादकडे येऊं लागला; तथापि सुंदरम्‌च्या मोठ्या आरोळ्यांमुळें तो महाभयंकर मासा दुसरीकडे वळला.

घाबरल्यामुळें मणि समुद्रांत बुडत होता; पण यावेळीं चंद्रशेखरानें मोठीच बहादुरी केली. आरडाओरडा न करतां तो पोहत पोहत मणीपाशीं गेला नि त्याच्या केंसट्यांना धरून त्यानें त्याला किनाऱ्यापर्यंत ओढीत नेलें.

मणि माशाच्या तावडींतून सुटल्याचें पाहिल्यावर रामप्रसाद नि सुंदरम् हे पोहत पोहत किनाऱ्यापर्यंत गेले.

मणीच्या पोटांत बरेंचसें पाणी शिरलें होतें. बुडालेल्या माणसाच्या बाबतींत कोणते उपाय योजावेत तें साऱ्याच मुलांना माहीत होतें दोन तीन तासांत मणि चांगलाच सांवरला; पण त्यानंतर मात्र तो पाण्याला जास्तच घाबरूं लागला !

आपली शिकार निसटल्यामुळें तो शार्क मासा बराच नाराज झाला असावा; कारण त्यानंतर तो सारा दिवस किनाऱ्या-वरच्या भागांत घोटाळत होता.

'आजच्या अनुभवावरून आपण योग्य तो धडा घेतला पाहिजे. शक्य तों समुद्रांत पोहणें किंवा स्नान करणें या गोष्टी आपण बंद केल्या पाहिजेत. आज बिचारा मणि वांचला ही मंडपे-श्वराची कृपा !' सुंदरम् म्हणाला.

भोजनोत्तर संध्याकाळीं जंगलांतून आवश्यक तें सामान आणण्याची योजना ठरली; पण त्यावेळीं सुंदरम्‌नें मणीला जंग-लांत जाण्याची मनाई केली. मणीनें फारच हट्ट धरला; तथापि अखेर विश्रांतीसाठीं त्याला झोंपड्यांत—नव्हे, महालांत अडकन

पडावें लागलें. बाकीचे तिघेहि जंगलांत निघून गेले नि बिचारा मणि मात्र निरुपायास्तव मंडपेश्वर महालांत अडकून पडला.

सूर्यास्तापूर्वींच ते तिघेहि जंगलांतून परत आल्याचें मणीला कळलें. ते तिघेहि मोठ्यानें ओरडत येत होते. जणुं त्यांनीं कुस्तीचेंच मैदान मारलें होतें !

ते तिघेहि झोंपड्यापाशीं आल्यावर त्यांनीं खरोखरीच चांगली मोठी कामगिरी केली असल्याचें मणीला कळलें. रामप्रसाद नि चंद्रशेखर यांनीं आपापल्या खांद्यावर एकेक करडूं घेतलें होतें नि त्यांच्यामागून एकेक बकरी बेंबटत येत होती.

सुंदरम्‌च्या खांद्यावर भलेंमोठें बोचकें होतें. मणीनें तें खालीं उतरलें अन् सोडून पाहिलें तेव्हां त्याच्यांत बरीचशीं उसाचीं कांडीं, केळीं, रताळीं नि शहाळीं हीं असल्याचें मणीला दिसलें.

'या बकऱ्या नि त्यांचीं पोरें तुम्हांला मिळालीं कशीं ?' मणीनें विचारलें.

'चरत होतीं.' रामप्रसाद म्हणाला, 'आम्ही त्यांचा पाठलाग करतांच बकऱ्या लांब पळाल्या नि त्यांचीं पोरें मागें राहिलीं. आम्ही पोरांना खांद्यांवर घेऊन परतलों, तेव्हां बकऱ्याहि आमच्या मागून चालूं लागल्या !'

'या बकऱ्या आपण पाळूं !' मणि मोठ्या उत्सुकतेनें म्हणाला, 'अन् यांचें दूध पिऊं; पण साखर कुठें आहे दुधांत टाकायला ?'

'साखरेची व्यवस्था केली आहे आम्ही !' चंद्रशेखर म्हणाला, 'ही घे साखर ! या उसाच्या कांड्यांचीं सालें तासून त्याच्या गंडेऱ्या तयार कर ! तोंडांत दुधाचा घोट घे नि एक गंडेरी चाव, म्हणजे दूध गोड होईल !'

'पण या बकऱ्या ठेवायच्या कुठें दादा?' मणीनें सुंदरम्‌ला विचारलें.

'आण माझे दोरीचे दोन्ही तुकडे.' सुंदरम् म्हणाला, 'अन् दोन्ही पोरांना बांधून ठेव. बस्स! बकऱ्या कुठेंहि जाणार नाहींत; पण यांच्यासाठीं आपल्याला एक वाडगें बांधावें लागेल अन् आपण तसें केल्यावर हव्या तितक्या बकऱ्या पाळतां येतील आपल्याला.'

बरेचसे वांसे उरले होते. दुसऱ्या दिवशीं चारहि झाडांना कळकाचे वांसे बांधून वाडगें तयार करण्यांत आलें नि त्यापुढच्या एकाच आठवड्यांत बऱ्याचशा बकऱ्या त्या वाडग्यांत कोंडल्या गेल्यानें त्या चौघांचीहि दुधाची ददात मिटली!

◆ ◆

# सात

शार्क माशामुळें आलेल्या सागरी संकटानंतर मणि समुद्राच्या बाजूला कधींहि जात नसे नि बाकीचे तिघेहि त्याला तिकडे कधींच नेत नसत. इतकेंच नव्हे, तर ते शार्क माशाच्या बाबतींत सतत सावध रहात असत. दोनचारदां त्यांना तो दिसला, तेव्हां त्यांनीं वेगानें पोहत पोहत किनारा गांठला.

ते वादळांत सांपडलें होते, त्या दिवसानंतर पुन्हा पाऊस पडला नव्हता; म्हणून झऱ्याचें पाणी थोडेसें आटलें होतें. मणि त्या झऱ्याच्या पाण्यांत स्नान करी.

त्या दिवशीं चंद्रशेखर, रामप्रसाद नि सुंदरम् या तिघांनीं सागरस्नान केलें अन् नंतर ते न्याहारीच्या तयारीला लागले. मणि झऱ्याच्या पाण्यांत स्नान करीत होता. न्याहारीची सिद्धता झाल्यावर रामप्रसादनें त्याला हांक मारली, ' मणिभाई, किती वेळ आघोळ करतो आहेस. काकस्नान उरक नि ये झटपट न्याहारीला. कावळे कोकलताहेत आमच्या पोटांत ! '

बराच वेळ होऊन गेला, तरी मणि आला नाहीं ! तो कां येत नाहीं तें पहावें म्हणून चंद्रशेखर झऱ्यापाशीं गेला नि घावरा-घुबरा होऊन परत आल्यावर म्हणाला, ' मणिभाई तिथें नाहीं दादा. त्याचीं जुतीं नि कपडे झाडींत पडलेले आहेत. '

तिघेहि मुलगे घाबरले नि झऱ्यापाशीं धांवत गेले. त्यांनीं आजूबाजूला पाहिलें; तथापि मणि त्यांना कुठेंच दिसला नाहीं. त्या तिघांनीहि त्याला मोठमोठ्यानें हांका मारल्या; पण त्यांच्या त्या हांकांना मणीकडून उत्तर मिळालें नाहीं.

तिघांच्याहि डोळ्यांत अश्रु उभे राहिले. मणि सर्वांत धाकटा असल्यानें तिघांचाहि तो लाडका होता.

' बाबांनो, आतां न्याहारी करायला माझें मन घेत नाहीं. माझ्या तोंडांत जाणार नाहीं ती. ' चंद्रशेखर म्हणाला, ' सारें सामान गुंफेंत ठेवा. चला जाऊं मणीला शोधायला. कदाचित तो जंगलांत कुठेंतरी भटकत असेल. '

' जुतीं काढून ठेवून तो जंगलांत अनवाणी गेला असेल असें तुला वाटतें ? '

' तुझा प्रश्न योग्य आहे; ' सुंदरम् म्हणाला, ' तथापि त्याचीं जुतीं अन् कपडे हीं आपण गुंफेंत आणून ठेवूं नि त्याला इकडे-तिकडे शोधूं चला ! '

जंगलांत जाऊन त्यांनीं त्याचा तासभर तपास केला. अखेर तो आपल्याला आतां कायमचा अंतरला अशी मनांत कल्पना केल्यावर ते दुःखी मनानें नि जड पावलांनीं गुंफेपाशीं परत आले.

अन् पहातात तों मणि मंडपेश्वरमहालांत पाय सोडन बसला असल्याचें नि त्याचवेळीं तो न्याहारीवर आडवा हात मारीत असल्याचें त्यांना दिसलें !

' अरे, तूं कुठें कडमडला होतास मणि ? ' तिघांनीहि गद्गद स्वरांत त्याला विचारलें.

'आंघोळ करीत होतों.' मणि म्हणाला.

'आंघोळ कुठें करीत होतास?' सुंदरम्‌नें त्याला थोडयाशा कठोर स्वरांत विचारलें, 'आम्ही तुला झऱ्याच्या आजूबाजूला धुंडाळलें होतें.'

'जेव्हां तुम्ही झऱ्यापाशीं गेलां होतां, तेव्हां मी झऱ्यामागें असलेल्या एका गुंफेंत होतों.' मणि हंसत हंसत म्हणाला, 'अन् जेव्हां तुम्ही इथें आपापसांत सल्लामसलत करीत होतां, तेव्हां मी इथवर आलों होतों; पण त्यापूर्वींच तुम्ही माझीं जुतीं नि वस्त्रें हीं इथें आणून ठेवलींत; पग मी उघडानागडा कसा येणार तुमच्यासमोर?'

'एवढयाशा गोष्टीसाठीं तूं आम्हाला किती सतावलेंस?' रामप्रसादनें आपला लटका राग प्रकट केला.

'एवढीशी गोष्ट नव्हे ती, तुम्ही अगोदर तुमची न्याहारी उरकून घ्या नि मग मी तुम्हांला मोठी गोष्ट दाखवितों.' मणीनें रहस्यमय भाषेंत त्यांना सांगितलें.

न्याहारीचे पदार्थ आणले गेले. तीनहि मुलांनीं जेव्हां भाजलेल्या मासळीला हात लावला, तेव्हां मणीनें पानांत गुंडाळलेली कसलीतरी वस्तु त्यांच्या पुढयांत ठेवली.

'हें काय आहे?' चंद्रशेखरनें विचारलें.

'चाखून पहा ना' मणि हंसत हंसत म्हणाला.

'अरेच्या, हें तर मीठ आहे!' चंद्रशेखर ओरडला.

'मोठी मजा झाली.' रामप्रसाद मीठ चाखतां चाखतां म्हणाला.

'कुठें सांपडलें तुला हें?' सुंदरम्‌नें मणीला विचारलें.

'अगोदर न्याहारी उरकून घ्या, मग मी सांगतों सारें.' मणि रहस्यमय भाषेंत पुन्हां उत्तरला.

इतके दिवस त्यांना मीठ मिळालें नव्हतें. विस्तवावर भाजलेली बिनमिठाची मासळी त्यांना तितकीशी चवदार वाटत नव्हती; तथापि त्यांचा निरुपाय झाला होता. आज मीठ पाहिल्यावर ते पोरगे हरखून गेले.

'खूप खा ! हवें तेवढें मिळेल मीठ.' मणि हंसत हंसत म्हणाला.

'अच्छा, आतां सांग आम्हांला !' न्याहारी आटोपल्यावर आपलें तोंड पुसतांना चंद्रशेखर मणीला म्हणाला.

'चला.' मणीनें आपल्या सोबत्यांना सांगितलें.

'या झऱ्यांत मीठ आहे ?' रामप्रसादनें मणीला विचारलें.



'होय; पण तुमच्या पायांतलीं पायतणें काढा अगोदर.' मणि म्हणाला.

मणि त्या तिघांहि सोबत्यांना झऱ्याच्या मागील बाजूस असलेल्या उंचवटयापाशीं घेऊन गेला. त्या उंचवटयांत माणसाला सहज शिरतां येण्याइतकें मोठें विवर असल्याचें पाहिल्यावर ते तिघेहि आश्चर्यचकित झाले.

'अगदीं निःसंकोचपणें या.' असें म्हणून मणीनें त्यांना त्या

विवरांत घुसविलें. विवरांतून ते चौघेहि सुमारे आठदहा हातांपर्यंत चालत गेल्यावर ते एका मोठ्या गुंफेंत जाऊन पोहोंचले. गुंफेंत थोडासा अंधार होता, म्हणून त्यांना थोडा वेळ कांहींच दिसलें नाहीं तिथें; पण त्यांच्या नजरांना आस्ते आस्ते अंधाराचा अभ्यास झाल्यानें त्यांना नंतर गुंफेंतली सुमारें पन्नास औरसचौरस हात जमीन साफ सुकी आहे नि ती वाळूनें झांकली आहे, गुंफेच्या पूर्वेकडे नि पश्चिमेकडे असलेलीं भिंताडें मिठाच्या मोठमोठ्या लाद्यांनीं बनविलीं असून तीं विवरावाटे आंत येणाऱ्या अधुक प्रकाशामुळें चमकत आहेत असें स्पष्ट दिसून आलें. ती गुंफा पाहिल्यावर तिघांनीहि तोंडांत बोटें घातलीं.

'आज तूं आम्हां तिघांनाहि भयंकरच सतावून सोडलेंस;' सुंदरम् म्हणाला, 'पण त्याबरोबरच मीठ नि गुंफा यांचा शोध लावून तूं मोठें बहाद्दरीचें कृत्य केलेंस! अगदीं तुझी पाठ थोपटण्याइतकें मोठें! अन्नांत मिठाला महत्व असतें. मिठाशिवाय पंचपक्वान्नें जरी पानावर वाढलीं, तरी तीं पक्वान्नें जेवणाऱ्याला बेचव वाटतील अन् म्हणूनच मिठाला 'सबरस' असें म्हणतात!'

गुंफेंतून बाहेर पडल्यावर ते चौघेहि मुलगे बाहेरच्या टेकाडावर बसले.

'बावांनो, आमच्या गृहस्थाश्रमाचें स्वरूप आस्ते आस्ते व्यापक होत चाललें आहे! ही सारी त्या मंडपेश्वराची कृपा!' सुंदरम् म्हणाला, 'आतां आमच्यापाशीं मीठ, साखर नि दूध हीं आलीं; पण आम्हांला आतां आणखीनहि कांहीं कामें करायचीं आहेत. सर्वांनीं विचार करा नि काय करायचें तें ठरवा.'

'कपड्यांचें काय करायचें?' चंद्रशेखर म्हणाला, 'आमच्या अंगावर असलेले कपडे किती काळ टिकणार?'

'तुझें म्हणणें खरें आहे चंद्रशेखर;' सुंदरम् गंभीर स्वरांत म्हणाला, 'तथापि तुझ्या या प्रश्नाचें उत्तर मला चटकन् देतां येणार नाहीं. या बेटांतलीं माणसें झाडांच्या सालीपासून वल्कलें बनवितात असें मीं ऐकलें आहे; पण तीं झाडें माझ्या ओळखीचीं

नाहींत अन् या बेटावरचें हवामान आपल्याकडच्या मद्रास विभागासारखें असल्यानें आपल्याला अधिक आवश्यकताहि नाहीं कपडयांची इथल्या मूळच्या माणसांप्रमाणें कमी कपडे वापरण्याचा आपण सराव करूं अन् पुढें मागें कपडयांची कांहीं सोय झाली तर पाहूं.'

'अन् जुतीं ?' रामप्रसाद म्हणाला, 'जुतींहि जास्त दिवस नाहींत टिकायचीं.'

'ठीक बोललास.' सुंदरम् म्हणाला, 'पुढें मागें बकऱ्यांच्या किंवा डुकरांच्या कातडयांचीं जुतीं बनविण्याचा प्रयत्न करूं आपण.'

'माझ्यापाशीं जर एखादी बंदूक असती, तर मी डुकरांची किंवा पांखरांची शिकार केली असती !' मणि मध्येंच म्हणाला.

'त्याची तजवीज आजच करतां येईल !' सुंदरम् म्हणाला, 'तथापि त्याचा सराव करावा लागेल. आणा एक वांसा नि एक चाकू !'

त्यानंतर सुंदरम्नें वांसा चिरून त्याच्या कांबी केल्यावर एका कांबीच्या दोन्ही टोंकांना लहान लहान खांचा पाडल्या. त्यानंतर ज्या दोरीनें बकऱ्यांना बांधलें होतें, त्या दोरीचे धागे त्यानें अलग अलग केले नि त्या धाग्यांची प्रत्यंचा बनविल्यावर मधोमध एक शिडाच्या कापडाचा तुकडा शिवून टाकला !

'ही घे, झाली गलोल तयार !' असें म्हणून त्यानें एक लहानसा दगड त्या गलोलींतून सोडतांच तो बराच दूर गेला ! त्यानंतर तो म्हणाला, 'पांखरें किंवा डुकरांचीं पिल्लें मारायला हिचा फार उपयोग होईल ! पुढें मागें आपण धनुष्य-बाण तयार करूं !'

'पण बाणाला लागणारा लोखंडी फाळ आपल्याकडे कुठें आहे ?' मणीनें विचारलें.

'आपल्या खजिन्यांत एक फुटकी बाटली आहे. तिचे टोंकदार तुकडे फाळाचें काम करतील !' सुंदरम्नें सांगितलें.

# आठ

त्या मुलांचे पुढचे दोन आठवडे तिरंदाजीच्या सरावांत व्यतीत झाले ! त्या मुलांनीं फार कष्ट करून दोन धनुष्यें नि कांहीं गलोली हीं बनविलीं होतीं. बाण बनविण्याच्या बाबतींत काड्यांची कमतरता नव्हती ! त्यांच्या पुढच्या टोंकांना कांचेचे अणकुचीदार तुकडे जोडून फाळ बनविण्यांत आले होते अन् चंद्र-शेखरानें तिरंदाजीच्या सरावांत जीं समुद्रांतलीं पाणकिरीं मारलीं होतीं, त्यांचीं पिसें त्या बाणांच्या दुसऱ्या टोकांना जोडून दिल्या-मुळें ते बाण पूर्वीं भारतांत समरसमयीं वापरण्यांत येत असलेल्या बाणांसारखे बनले होते ! अगदीं धनुर्धारी अर्जुनाच्या किंवा एकलव्याच्या बाणांसारखे ! सराव करतां करतां ते चौघेहि मुलगे अल्पावधींतच तिरंदाजींत तरबेज झाले !

त्याच अवधींत कळकाच्या पोकळ दंडुक्यांत कांचेचे अण-कुचीदार तुकडे बसवून त्या मुलांनीं चार भालेहि तयार केले !

अशा प्रकारें त्या चौघांहि मुलांचे शस्त्रास्त्रांचे प्रयोग चालले

होते; तथापि त्यांना आवश्यक असलेल्या इतर कामांचा मुळींच विसर पडला नव्हता !

मणीनें मातीपासून बरींच भांडीं बनविलीं ! त्यानें बनविलेलीं मातीचीं ताटें वाईट दिसत नव्हतीं; तथापि मडकीं मात्र परमेश्वरासारखीं निराकार होतीं ! तीं ओबडधोबड होतीं. आव्यांत टाकलेलीं कांहीं भांडीं चिरावलीं होतीं; तथापि त्यांच्यांतून शाबूत राहिलेलीं भांडीं दिखावू नसलीं, तरी तीं खात्रीनें टिकावू होतीं. त्यानें तयार केलेली मडकी चुलीवर चढवितां येण्यासारखी नव्हती; पण तिचा उपयोग करण्याची एक युक्ति चंद्रशेखरानें शोधून काढली ! त्यानें त्या मडकीच्या अर्ध्या भागाएवढा एक खड्डा तयार केला नि त्याच्यांत ती मडकी बसविली. त्या मडकीच्या भोंवतालची दोनतीन इंचांची जागा सोडून तिच्या चोहों बाजूंला चार पोकळ नाल्या तयार केल्या ! जे जिन्नस उकडायचे असतील ते जिन्नस त्या मृतिकापात्रांतल्या पाण्यांत टाकायचे नि चारहि नाल्यांत पेटते कोळसे भरायचे, कीं थोड्याच वेळांत उकडले गेले सारे जिन्नस ! जिन्नस कसले कर्माचे ? फक्त रताळींच ! भात शिजवायला तिथें तांदूळ होतेच कुठें मुळीं ! तिथें भातहि मिळत नसे नि पेजहि मिळत नसे त्या बापड्यांना !

सुंदरम्‌च्या जुत्याचा तळवा कामांतून गेला होता; पण त्यानें त्याला समुद्रकांठीं मिळालेल्या जुत्याचा तळवा सुतळीच्या साह्यानें आपल्या जुत्याच्या तळव्याला जोडला नि बाकीच्यांचींहि फाटकीं जुतीं व्यवस्थित शिवून टाकलीं !

हळूहळू ते चौघेहि मुलगे लंगोट्या लावून हिंडूंफिरूं लागले. उष्ण हवेमुळें त्यांच्या अंगाची कातडी काळसर पडली नि पावलें तर इतकीं कठीण झालीं, कीं पावलांत रुतलेल्या कांट्यांची किंवा पावलांना लागलेल्या ठेंचांची त्यांना जाणीवच होईनाशी झाली !

मध्यंतरीं कांहीं दिवसांपासून पश्चिमेकडून वारा वाहूं लागला; कीं कसला तरी दुर्गंध त्यांच्या नाकांत शिरत असे नि त्याबरोबरच मावळतीकडे सारा दिवस गिधाडें घिरट्या घालीत असल्याचें त्यांना दिसे.

चंद्रशेखराला रहावेनासें झालें. तो तपासासाठीं गेला नि परत आल्यावर आपल्या तिघां सोबत्यांना त्यानें जी हकीकत सांगितली, ती ऐकतांच त्यांना फारच आश्चर्य वाटलें !

चंद्रशेखर त्यांना म्हणाला, ' तिथें जाऊन मीं पाहिलें तेव्हां थोड्याशा पाण्यांत, पण समुद्राच्या वाळूवर एक मोठा–बराच मोठा–राक्षस पडला असल्याचें मला दिसलें. त्याच्या धडापेक्षां त्याचें शिरच मोठें आहे अन् त्याचें तोंड तर एवढें मोठें आहे, कीं आम्हां चौघांनाहि त्या तोंडांत ऐसपैस बसतां येईल ! गिधाडें नि पाणकिरीं यांची तर तिथें मोठी सभाच भरली आहे ! चल दादा, आपण सारेजण जाऊं तिथें नि तो कसला प्राणी आहे तें पाहून येऊं ! '

त्यांनीं सकाळची न्याहरी आटोपली अन् दुपारच्या जेवणाचे जिन्नस नि आपलीं शस्त्रास्त्रें बरोबर घेऊन ते चौघेहि मुलगे तो महाराक्षस पहाण्यासाठीं मंडपेश्वर महालांतून बाहेर पडले.

सूर्य माथ्यावर येण्याच्या सुमारास ते तिथें जाऊन पोहोंचले. मोठमोठीं गिधाडें नि पाणकिरीं ओरडत नि आपापसांत झगडत असल्याचें दुरूनच दिसलें त्यांना. ते ज्या जागीं जाऊन पोहोंचले होते, तिथल्या टेकड्या दक्षिण दिशेकडे वळल्या होत्या नि त्यांच्या शेजारींच अलग अशी एक वीस पंचवीस फूट उंचीची टेकडी होती.

सुंदरम् त्या टेकडीपाशीं जाऊन पोहोंचल्यावर आपल्या सोबत्यांना म्हणाला, ' तुम्ही पुढें जा नि पहा काय आहे तें. मात्र

त्या गिधाडांपासून सावध रहा बरें! तीं गिधाडें कधीं कधीं माणसांवरहि हल्ला करतात म्हणे. मी येतोंच इतक्यांत तिथें.'

त्या तिघांहि मुलांनीं जवळ जाऊन पाहिलें. एका विशाल जलचराची फक्त खोपडी तेवढी समुद्रकांठाच्या पुळणीवर पडली होती. ती बऱ्याच दिवसांपूर्वी तिथें पडली होती हें निश्चित. कारण डोक्याशिवाय त्या प्राण्याचें सारें धड गिधाडांनीं नि पाणकिऱ्यांनीं खाऊन फस्त केलें होतें. त्याच्या हाडांचा भलामोठा सांपळा मात्र तिथें दिसत होता. शिवाय भलीमोठी खोपडी नि पसरलेला जबडा!



'हें कोणतें जनावर आहे दादा?' सुंदरम् तिथें जाऊन पोहोंचल्यावर मणीनें त्याला विचारलें.

'अरे, हा व्हेल मासा आहे.' सुंदरम् म्हणाला, 'मी पूर्वींच समजलों होतों.'

'भयंकर घाण सुटली आहे!' चंद्रशेखर म्हणाला, 'याचे तुकडे करावे नि ते समुद्रांत फेकून द्यावे असें मला वाटतें.'

'अरे, असा अविचार करूं नकोस.' सुंदरम् म्हणाला, 'ही

व्हेल माशाची खोपडी इतकी उपयोगी आहे, कीं तुला त्याची कल्पनाहि होणार नाहीं. चार सहा दिवस ही अशीच असूं दे इथें. गिधाडें ती साफ करतील. त्यांनीं तसें केल्यावर आम्ही आमचें काम करूं. तोंवर आपल्याला कांहीं तयारीहि करायला हवी.'

'या खोपडीपासून आपण कोणतें काम करायचें?' रामप्रसादनें विचारलें, 'अन् तयारी कसली करायची?'

'तयारी कसली करायची तें आत्तांच सांगतों' सुंदरम् म्हणाला, 'अन् काम कोणतें करायचें तें मागाहून सांगेन!'

सुंदरम् थोडा वेळ ज्या टेकडीपाशीं थांबला होता, त्या टेकडीवर तो बाकीच्या तिघांनाहि घेऊन गेला.

विचित्रच होती ती टेकडी! तिच्या माथ्यावर एक वाटोळा खळगा होता नि त्याच्या आंतला भाग गुळगुळीत होता. एकहि फट नव्हती तिथें. फक्त माती सांचली होती.

'या टेकडीवर हा खोलगट खळगा कसा पडला दादा?' मणीनें विचारलें.

'इथें कुंभकर्णाची म्हैस बांधली जात असेल पूर्वीं,' चंद्रशेखर म्हणाला, 'अन् तिच्या आंबोणाचें हें भलेंमोठें घमेलें इथें पडलें असावें!'

'लाखों वर्षांपूर्वीं इथें ज्वालामुखी पर्वत असावा.' सुंदरम् सांगूं लागला, 'अन् त्याच्या पोटांतला लाव्हा रस या मुखांतून बाहेर पडत असावा. कांहीं काळानें तो ज्वालामुखी पर्वत थंडावला नि त्याच्यांतून निघत असलेल्या लाव्हा रसापासून हा खळगा बनला आहे! आम्हांला कांहीं दिवसांत बरेंचसें तेल मिळणार आहे; पण तें कुठें ठेवावें असा मला प्रश्न पडल्यामुळें तुम्हांला पुढें जायला सांगून मी इथें आलों. अच्छा. आतां सारेजण या खळग्यांतली माती बाहेर फेकूं नि हा खळगा साफ करूं!'

'तेल ? आहे कुठें तेल ?' रामप्रसादानें सुंदरम्‌ला विचारलें.

'जिथें व्हेल तिथें तेल ! अगोदर खळग्यांतली माती बाहेर काढा नि तो साफसूफ करा !' सुंदरम्‌ म्हणाला, 'मग सारें सांगतों तुम्हांला !'

ते चौघेहि मुलगे त्या टेकडीवरच्या एका झाडाखालीं बसून जेवले नि नंतर त्यांनीं त्या खळग्यांत सांचलेली माती काठ्यांनीं उकरून ती बाहेर फेकायला सुरवात केली. अस्तमानापूर्वींच तो खळगा साफसूफ केला त्यांनीं ! त्यानंतर ते चौघेहि मुलगे 'मंडपेश्वर महाला' कडे निघून गेले.

पुढच्या आठ दिवसांत त्या चौघांहि मुलांनीं बरेच कष्ट केले. त्यांनीं मातीपासून बरेचसे घडे नि मडक्या हीं बनविलीं नि तीं आव्यांत भाजून काढलीं. घड्यांपैकीं दोन तीन घडे चिरावले; पण डझनभर घड्यांपैकीं बाकीचे आठ नऊ घडे कामाजोगते झाले.

'आपण उद्यां मोठ्या पहांटेला उठूं नि व्हेल माशाच्या खोपडीपासून तेल तयार करण्यासाठीं जाऊं.' सुंदरम्‌ आपल्या तिघांहि सोबत्यांना म्हणाला, 'जातांना सारे घडे, शिडी नि थोडेसे वांसेहि बरोबर न्यावे लागतील आम्हांला ! कदाचित दोन तीन दिवस तिथें काढावे लागतील असें वाटतें. त्यासाठीं सारें आवश्यक तेवढें सामानहि बरोबर घ्यावें लागेल.'

# नऊ

'दादा, मला सांग,' मणि म्हणाला, 'व्हेल माशाच्या खोपडींतून तेल कसें निघणार?'

सुंदरम् सांगूं लागला, 'हें पहा मणि, व्हेल हा वास्तविक मासाच नव्हे! प्राणीशास्त्रज्ञांचें मत असें आहे कीं, या जगाचा प्रारंभ समुद्राच्या पाण्यापासून झाला. नंतर समुद्रांतल्या वनस्पति नि प्राणी हे आस्ते आस्ते जमिनीवर फैलावले; पण कांहीं प्राणी जमिनीवरून पुन्हां समुद्रांत गेले. सील नि व्हेल हे दोन प्राणी त्यांच्यापैकींच आहेत. समुद्रांतले इतर मासे अंडीं घालतात; पण सील प्राणी पिल्लांना जन्म देतात नि त्यांना दूधहि पाजतात! थोडचा थोडचा वेळानें ते आपलीं डोकीं पाण्यांतून बाहेर काढतात नि श्वासहि घेतात. व्हेल हा दुनियेंतला सर्वांत मोठा प्राणी आहे! एखादा व्हेल सुमारें शंभरांहून जास्त फूट लांब असतो नि त्याचे वजनहि शेंकडों मण असतें! व्हेलच्या लहानमोठ्या जाती आहेत. त्यांतला हा एक आहे. याचें डोकें फार मोठें असतें असतें अन् त्याच्यांत तेल असतें!'

'तेल कां भरलेलें असतें त्याच्या डोक्यांत ?' चंद्रशेखरनें विचारलें.

'तेल पाण्यापेक्षां हलकें असतें.' सुंदरम् म्हणाला, 'म्हणून श्वास घेण्यासाठीं पाण्यांतून डोकें वर काढण्याच्या कामीं त्याचा उपयोग होतो.'

'व्हेल खातो काय ?' रामप्रसादनें विचारलें.

'त्याचा आहार अल्पसा आगळाच आहे!' सुंदरम् म्हणाला, 'एवढें मोठें जनावर; पण त्याच्या घशाची पोकळी इतकी लहान असते कीं, तिच्यांतून बेडकीलाहि पोटांत शिरतां येणार नाहीं! समुद्राच्या पाण्यांत लहान लहान रोपटीं असतात. व्हेल आपलें भलेमोठें तोंड उघडून समुद्राचें पाणी आंत ओढून घेतो. पाण्याबरोबर रोपटींहि त्याच्या पोटांत जातात. त्यानंतर पोटांतलें पाणी तो आपल्या नाकपुडयांवाटें बाहेर सोडतो, त्यावेळीं समुद्राच्या पाण्यांतून उंच फवारे उडत असतात नि ते पाहिल्यावर व्हेल त्या वाटेनें जात असल्याचें कळतें.'

अशा प्रकारें बोलतां बोलतां ते त्या खोपडीपाशीं जाऊन पोहोंचले. तेथें पुळणींत बसल्यानंतर सुंदरम्‌नें एका लांब काठीच्या टोंकाला तुंबाफळापासून तयार केलेला एक कमंडलु बांधला नि भलीमोठी डवली तयार केली.

सारी तयारी केल्यावर शिडी लावून तो त्या खोपडीवर चढला. त्याच्यामागून बाकीचे तिघेहि मुलगे तिच्यावर चढले अन् तिथें बसल्यावर छिन्नी नि हातोडी यांच्या सहाय्यानें त्यांनीं खोपडीच्या मागील बाजूस भोंक पाडायला सुरुवात केली. दोन तासांच्या प्रयासानंतर डवली आंत शिरण्याएवढें मोठें भोंक तयार झालें. नंतर सुंदरम्‌नें ती डवली त्या भोंकावाटें खोपडींत घातली नि तिच्यांतलें पांढऱ्या रंगाचें डवलीभर तेल बाहेर काढलें. ती

चरबी होती नि तिला विचित्र वास येत होता.

'चंद्रशेखर, तूं माझ्यासोबत रहा.' सुंदरम् म्हणाला, 'तुझें काम कष्टाचें आहे. मी डवलींतून तेल काढतों नि तें घड्यांत ओततों. तूं ते घडे मोठ्या सावधगिरीनें खालीं उतर.'

'मणि, तूं शिडीच्या खालीं उभा रहा. चंद्रशेखराच्या हातांतला एकेक भरलेला घडा घे नि तो टेकडीच्या पायथ्याशीं उभ्या असलेल्या रामप्रसादाजवळ दे!'

'रामप्रसाद, तूं मणीजवळचा घडा घेऊन वर चढ नि घड्यांतलें तेल कुंभकर्णाच्या म्हशीचें जें भलेंमोठें घमेलें आहे, त्याच्यांत ओतल्यावर रिकामा घडा परत आणून तो मणीजवळ दे. मणि तो घडा चंद्रशेखरापाशीं देईल नि त्याच्याकडून भरलेला दुसरा घडा घेईल.'

सुंदरम्नें आंखलेल्या योजनेप्रमाणें तें शिस्तबद्ध काम सुमारें दोन तास चाललें; पण पन्नास घडे तेल जमवीपर्यंत ते चौघेहि मुलगे फारच थकून गेले. अखेर काम थांबवावें लागलें.

'विश्रांतीपूर्वी आपल्याला एक काम करायचें आहे.' सुंदरम् म्हणाला, 'गवत नि वांशाचे तुकडे यांच्यापासून एक लहान नि एक मोठें अशीं दोन झांकणीं तयार करा. त्यांच्यांतलें मोठें म्हशीच्या घमेल्यावर ठेवा नि दुसरें खोपडीच्या भोंकावर ठेवा. तीं झांकणीं वाऱ्यानें उडून जाऊं नयेत, म्हणून त्यांच्यावर जड धोंडे ठेवा.'

सूर्यास्ताच्या सुमारास समुद्राचें स्नान करून त्यांनीं आपापल्या अंगाचा घाम नि घाण हीं धुवून टाकलीं.

'अजून तेलाची घाण गेली नाहीं.' मणि म्हणाला, 'जर आमच्याकडे सुगंधी साबण असता–'

'होईल तयार!' सुंदरम् म्हणाला, 'या बेटाच्या दक्षिण

दिशेला सावण तयार करतांना उपयोगी पडणारी वाळू मीं पाहिली आहे. ती वाळू नि व्हेलचें तेल हीं एकत्र शिजवून मी सावण बनवीन. फार सुरेख नि सुगंधी होणार नाहीं; पण आंघोळ नि कपडे धुणें या दोन्ही कामीं तो आमची गरज भागवील !'

दुसऱ्या दिवशींच्या अस्तमानापर्यंत त्या चौघांहि मुलांनीं बरीच मेहनत घेतली नि व्हेलची खोपडी खालीं केली. सुमारें दोनशें घडे चरबी म्हशीच्या घमेल्यांत ओतली गेली.

रात्रीं न्हाणेंधुणें नि खाणेंपिणें आटोपल्यावर सुंदरम्‌खेरीज बाकीचे तीनहि मुलगे जरासे लवंडले. लवंडल्यावर मणि म्हणाला, 'दादा, आतां आपण आपल्या घरीं जायचें ना ?'

'इतक्यांत कुठचें घर नि कुठचें दार मणि ? अजून बरेंच काम उरलें आहे. जितक्या मिळतील तेवढ्या व्हेलच्या फांसळ्या जमवून त्या इथे कुठेंतरी ठेवल्या पाहिजेत.'

'फांसळ्या कशाला ?' रामप्रसादानें विचारलें.

'पांचपन्नास कामें पार पाडतां येतील !' सुंदरम् म्हणाला, 'त्यांच्यापासून बाण बनवतां येतील, जमीन खणतां येईल.'

टिपूर चांदणें पडलें होतें. ते मुलगे समुद्रकांठावरच्या पुळणींत पालथे पडून विश्रांति घेत होते.

'चंदूभाई !' मणि म्हणाला, 'मी मघांपासून पहातों आहें. समुद्रांतली एक भलीमोठी कांसवी समुद्रांतून वारंवार बाहेर येत आहे नि वाळलेल्या वाळूंत गेल्यावर आपल्या पंजांनीं ती खळगा खणते आहे. नंतर तो खळगा ती वाळूनें बुजवीत आहे.'

'ती कांसवी त्या खळग्यांत अंडीं घालीत असेल.' चंद्रशेखर म्हणाला, 'उद्यां सकाळीं पाहूं आपण.'

अन् दुसऱ्या दिवशीं सकाळीं खळगा खोदल्यावर त्याच्यांत मोठमोठीं तेवीस अंडीं निघालीं.

'मडक्यांत उकडूं नि मिठाबरोबर खाऊं !' मणि म्हणाला, 'मग मोठी मज्जाच मजा !'

ते मुलगे त्या बेटावर आल्याला आतां तीन महिने झाले होते. सर्वसामान्य मुलगे असते, तर ते केव्हांच गचकून गेले असते; पण ते चौघेहि मुलगे मोठे धाडसी नि बुद्धिमान होते. सुंदरम्‌च्या देखरेखीखाली त्या मुलांनीं जगतां येईल अशीं सर्व साधनें बनविलीं होतीं. आतां त्यांच्यापाशीं रताळीं, केळीं, मासळी, दूध, साखर, अंडी इत्यादि खाद्यपदार्थ होते, विस्तवासाठीं कोळसे होते, दिव्यासाठी तेल होतें नि न्हाण्याधुण्यासाठीं साबणहि होता. शिकार करण्यासाठीं धनुष्य-बाण, गलोल नि भाले होते अन् माती नि तुंबाफळें यांच्यापासून बनविलेलीं भांडीहि होतीं ! फक्त कपडयांची कमतरता होती; पण तिथलें हवामानहि वस्त्रांवांचून मोठ्या मजेत कामें करतां येण्यासारखें होतें.

मणीनें अल्पावधींतच मातीचीं भांडीं बनविण्यांतलें कौशल्य प्राप्त करून घेतलें होतें. एक दिवशीं त्याला समुद्रकिनाऱ्यावर काळथर दगडाचा एक उंचवटा दिसला. छिन्नी नि हातोडी यांच्या साह्यानें त्यानें त्या उंचवटयांतून जात्याच्या तळीसारखा एक वाटोळा तुकडा खोदून काढला. त्यानंतर घासूनपुसून नि काटून छाटून त्याला योग्य तो आकार दिल्यावर त्यानें त्या तळीच्या मधोमध एक भोंक पाडलें अन् त्याच्यांत दांडा बसवून त्यानें कुंभाराचें चाक तयार केलें !

चाक फिरवून मृत्तिकापात्रें बनविण्याचें कुलाली कसब मणीनें आपल्या बालपणीं पाहिलें होतें. थोडे दिवस सराव केल्यावर तो चांगले घडे, प्याले, मडक्या, थाळ्या, इत्यादि भांडीं बनवूं लागला. तीं भांडीं आव्यांतल्या आंचीमुळें विशेषशीं चिरावत नव्हतीं नि अन्न शिजविण्याच्या कामीं तीं चांगलींच उपयोगी

पडत होतीं !

सुंदरम्‌नें एक लांकडी तिपाई तयार केली नि त्याच्या सूचनेप्रमाणें मणीनें एक बुडकुला नि त्याच्या तोंडावर घट्ट बसण्या-सारखें भोंक असलेलें एक झांकण बनविलें ! त्या बुडकुल्यांत व्हेलचें तेल भरण्यांत आलें नि शिडाच्या कापडाची मोठी वात बनवून ती त्या झांकणाच्या भोंकांत घट्ट बसविली गेली ! त्यानंतर मधोमध मोठें भोंक असलेल्या तिपाईखालीं तो बुडकुला ठेवल्यावर ती वात पेटविण्यांत आली. झाला वातींचा 'उमराव' स्टोव्ह तयार ! केरोसीनचें कारण नाहीं, काकड्याचें कारण नाही नि पंपाचेंहि कारण नाहीं.

अशाप्रकारें स्टोव्ह तयार झाल्यानंतर त्याच्यावर स्वयंपाक शिजविण्यात येऊं लागला. जोराचा वारा सुटल्यावर अन्न शिजवि-तांना जरा कठीण पडे; पण तो स्टोव्ह मंडपेश्वर गुंफेंतल्या निवांत जागीं व्यवस्थित पेटे नि त्यामुळें अन्न शिजविणेंहि सोपें जाई ! शिवाय त्या स्टोव्हमधून धूरहि क्वचितच बाहेर पडत असे.

आतां त्या मुलांचा दैनंदिन कार्यक्रम आंखल्यासारखा झाला होता ते रोज सकाळीं निजून उठल्यावर नि नंतर स्नान, न्याहारी इत्यादि विधी आटोपल्यावर शिकारीसाठीं किंवा खाण्या-पिण्याचे जिन्नस मिळविण्यासाठी बाहेर जात असत नंतर दुपारचें जेवणखाण आटोपल्यावर ते जंगलांतल्या सहलीसाठीं जात असत. रात्रीचें जेवण आटोपल्यावर ते गप्पागोष्टी करीत असत नि नंतर स्वस्थ झोंपत असत.

मोकळी हवा नि नियमित परिश्रम यांमुळें त्यांची प्रकृति फारच चांगली राहिली होती ते त्या बेटावर आल्यानंतर कधीहि आजारी पडले नव्हते.

'बाबांनो,' एका रात्रीं सुंदरम् बाकीच्या तिघांना म्हणाला,

'या बेटावर आपण तीन महिन्यांपूर्वी आलों. आपापसांत मिळून-मिसळून कामें केलीं. कारण पडलें तर आपण आपलें आयुष्यहि घालवूं इथें; पण आतां आपल्याला पुढची सोय पहायला हवी. आपण गलबतावर नोकरी धरली, तेव्हांच आपलें लिहिणेंवाचणें बंद पडलें होतें. वेळहि नव्हता आतां आपल्याला अवधि आहे; पण इथें शाळा नाहीं अन् शिक्षकहि नाहीं कुणी.

'या बाबतींत मीं एक विचार केला आहे. आमच्यांत एक गुजराथी आहे, एक बंगाली कायस्थ आहे, एक काशीक्षेत्रस्थ आहे अन् मी स्वत: तामिळ भाषिक आहें. आम्हीं इतरांना आपापली भाषा शिकविली, तर आमचें थोडेंबहुत ज्ञान वाढेल.

'दुसरी गोष्ट अशी आहे– आम्ही मोठे होईस्तोंवर आम्हांला इथें रहावें लागेल असें वाटतें. जगांतल्या सांसारिक कटकटींपासून आम्हीं दूर आहोंत नि मोठ्या मजेंत आहोंत यांत शंकाच नाहीं; पण आमच्या सुटकेचाहि कांहींतरी प्रयत्न केला पाहिजे आपण. त्यासाठीं आपण एक होडी बनवावी अशी माझी सूचना आहे.

'महाराष्ट्रांतल्या एका तेजस्वी संतानें– त्याचें नांव समर्थ रामदास स्वामी असें होतें– 'केल्यानें होत आहे रे। आधीं केलेंचि पाहिजे' असें आपल्या एका ग्रंथांत लिहिलें आहे. अर्थात् आपण प्रयत्न केला, तर काय होणार नाहीं? या भागांतले जंगली लोक ज्या पद्धतीनें होड्या बनवितात, त्या पद्धतीनें आपल्यालाहि एक होडी बनवितां येईल. वर्षानुवर्षें लागलीं, तरी हरकत कोणती? आमच्याकडे काळाची कमतरता आहे का?'

'कशी बनवायची होडी?' मणीनें विचारलें.

'त्या दिवशीं समुद्रकिनाऱ्यावर कोसळून पडलेल्या एका झाडावर बसलों होतों, त्यावेळीं मीं निरीक्षण केलें होतें. त्या झाडाचा वरचा–खालचा भाग साफ सडून गेला असला, तरी

मघला पंचवीस–तीस फूट भरेल एवढा भाग सुस्थितींत आहे. आपण वरचा–खालचा भाग जाळून अलग करूं अन् मधल्या भागाला सावधगिरीनें आग लावून तो भाग जळेलजळेल त्याप्रमाणें होडी बनेपर्यंत आस्तेआस्ते खोदीत जाऊं !'

दोन्ही प्रकारच्या योजनांस दुसऱ्याच दिवसापासून सुरुवात झाली.

रोज सकाळचीं कामें आटोपल्यावर दुपारपासून होडी बनविण्याचें काम चाले नि रात्रीचें जेवणखाण आटोपल्यावर जसें ज्याला आठवें, तसें त्याचें गाणें चालें ! सुंदरम् कंबनच्या रामायणाचे पाठ म्हणे, चंद्रशेखर चंडीदास ऐकवी. मणिभाई नरसी मेहता नि मीराबाई यांची भजनें गायी अन् रामप्रसाद तुलसीदासाचे दोहे नि सूरदासाचीं पदें म्हणे. चौघेंहि थोड्याच दिवसांत चारहि भाषांची वर्णमाला शिकले !

अशा प्रकारें त्या चौघांचाहि दैनंदिन कार्यक्रम नियमितपणें चालू होता.

एक दिवशीं दुपारीं होडी बनविण्यासाठीं ते जंगलांतून जात होते, तेव्हां कोणतें तरी जंगली जनावर एका झाडीत जमीन उकरीत होतें. त्याच्या पाठीमागचा भाग त्यांना दिसला होता.

रामप्रसाद सर्वांच्या पुढें चालत होता. त्यानें गलोलींत दगड भरला नि त्या जनावरावर सोडला तें जनावर मोठ्यानें गुरगुरलें नि मागें फिरलें. तो दांडगादुंडगा नि जुनापुराणा रानडुक्कर–छे, चुकलों ! रानडुक्कर या शब्दामुळें त्याचा अपमान होईल !–वराह होता ! त्याचे सहा इंची मोठमोठे सुळे त्याच्या तोंडांतून बाहेर आले होते !

मागें फिरल्यावर त्यानें रामप्रसादवर हल्ला केला ! कुठें ती छोटीशी गलोल नि कुठें तो भयानक डुक्कर ! रामप्रसाद

त्याच्या तावडींतून सुटण्यासाठीं एका बाजूला वळला; पण तो डुक्कर त्याला सोडायला थोडाच बसला होता! हां हां म्हणतां तो त्याच्यापाशीं जाऊन पोहोंचला. दुर्दैवानें एका दगडाची ठोकर लागल्यामुळें रामप्रसाद खालीं पडला नि क्षणार्धांत तो डुक्कर त्याच्या पाठीवर चढला. रामप्रसादाचें जीवन आतां आटोपलें नि तो डुक्कर आतां आपल्या अणकुचीदार सुळ्यांनीं त्याच्या अंगाच्या चिंधड्या करून टाकणार असें त्याच्या तिघांहि सोबत्यांना वाटलें.

ते तिघेहि त्याच्या मदतीसाठीं धांवले. दोन्ही बाजूंनीं दोन बाण आले आणि ते त्या डुकराच्या पोटांत घुसले! सुंदरम्‌नें त्याच्या गर्दनीवर भाल्याचा जोरानें हल्ला करतांच तो भाला त्याच्या गर्दनीतून आरपार गेला. तो डुक्कर अखेर रामप्रसादाच्या अंगावर कोसळला!

तिघांनीं मिळून त्या डुकराला बाजूला ढकलून दिलें! रामप्रसाद बेशुद्ध पडला होता; तथापि त्याला फारशी मोठी जखम झाली नव्हती!

मणीनें धांवत जाऊन एक शहाळें आणलें नि त्यानें त्याचें पाणी रामप्रसादाच्या तोंडांत ओतलें. रामप्रसाद तासाभरांत चांगला शुद्धीवर आला नि सुंदरम्‌च्या खांद्याचा आधार घेऊन लंगडत लंगडत परत मंडपेश्वर महालांत गेला!

डुक्कर मरून पडला होता. मणिभाई नि चंद्रशेखर यांनीं त्याच्या चारी पायांच्या मुसक्या बांधल्या, मध्यें एक वांसा घातला नि डुकराची ती पालखी त्यांनीं घरीं नेली!

'काय करायचें याचें चंदूभाई?' मणीनें विचारलें.

'चामडें काढूं नि चपला बनवूं!' चंद्रशेखरनें त्याला सांगितलें.

'अन् मांस शिजवून खाऊं! रानडुकराचें मटण पौष्टिक असतें म्हणतात!' मणि म्हणाला.

✦ ✦

# दहा

प्रशांत महासागराच्या ज्या भागांत तें बेट आहे, त्या भागांत वर्षाकांठीं फक्त दोनच ऋतु असतात ! चार महिने पावसाळा नि बाकी आठ महिने उन्हाळा !

तीं मुलें त्या बेटावर जाऊन पोहोंचल्याला आतां सहा महिने होऊन गेले होते. पावसाळ्याच्या अखेरीला ती तिथें गेलीं होतीं. ज्या वादळामुळें त्यांना आपलें गलबत गमावणें भाग पडलें होतें, तें पावसाळ्यांतलें अखेरचें वादळ होतें !

'हें पहा बाबांनो,' सुंदरम् सांगूं लागला, 'सहा महिन्यांपूर्वीं आपण इथें आलों. आतां दीडदोन महिन्यांनंतर इथें पावसाळा सुरू होईल अन् पावसाळा हच इथला खराब हंगाम आहे; त्यासाठीं आपण अगोदरच तयारीला लागलें पाहिजे !'

'कोणकोणती तयारी करायची ?' चंद्रशेखरनें विचारलें.

'वाळलेलीं लांकडें नि वाळलेला पालापाचोळा हीं जमवलीं पाहिजेत; आमच्या झोंपड्यांत पावसाची झड येऊं न देण्यासाठीं

तट्या तयार केल्या पाहिजेत; छप्पर उडून जाऊं नये म्हणून त्याच्यावर जड दगड ठेवले पाहिजेत. रताळीं, रोटीफळें इत्यादि जिनसांची बेगमी केली पाहिजे; समुद्रानजीकच्या तलावांत जे मासे आहेत, ते पकडून वाळत घातले पाहिजेत. अशा प्रकारें एक ना दोन हजार कामें पार पाडायचीं आहेत आपल्याला !'

गोष्ट सर्वांच्या लक्षांत आली नि दुसऱ्या दिवसापासून तयारीला सुरवात झाली !

प्रत्येकजण कामांत गढून गेला होता ! नावेची निर्मिती, झोंपड्यांची दुरुस्ती, जेवण्याचे जिन्नस जमविणें, तलावांतले मासे वाळविणें, इत्यादि कामें नियमितपणें चाललीं होतीं नि त्याबरोबर शिक्षणाचें कार्यहि बंद पडलें नव्हतें. आतां प्रत्येक मुलगा देवनागरी, बंगाली, गुजराथी नि तामिळ या वर्णमालांशीं परिचित झाला होता. इतकेंच नव्हे तर त्या भाषांतलीं काव्यें पाठ करणें नि भजनें म्हणणें हें त्यांच्या फुरसतीच्या वेळांतलें मनोरंजन होतें. त्यांच्या करमणुकीचें तेंच साधन होतें !!

त्यांचा वेळ मोठ्या मजेंत जात होता, पण एक दिवशीं अशी एक घटना घडली कीं, तिच्यामुळें त्यांची शांति नि निश्चिंति या दोन्ही गोष्टी एकदम खलास झाल्या !

त्या दिवशीं ते मुलगे मंडपेश्वर महालावर चढले होते नि त्याच्या छपरावर दगड ठेवीत होते.

'दादा, तें पहा काय आहे तें !' मणि उत्तर दिशेकडे बोट दाखवून म्हणाला.

कसल्यातरी काळ्या काळ्या वस्तु पूर्वेकडून पश्चिम क्षितिजाकडे चालल्या होत्या. डोळ्यांवर तळहाताची सावली धरून सुंदरम् त्या दिशेकडे पाहूं लागला !

'काय आहे दादा?' चंद्रशेखर नि रामप्रसाद यांनीं एकदम त्याला प्रश्न केला.

'होड्या!' सुंदरम्‌नें एकाच शब्दांत; पण चिंतायुक्त स्वरांत त्यांना उत्तर दिलें!

'आपण टेकडीवर विस्तव पेटविला तर तो त्या लोकांना दिसेल अन् आपण मोठ्यानें ओरडलों तर कदाचित आमची ओरड त्या लोकांना ऐकूं जाईल!' चंद्रशेखर म्हणाला.

'लक्षणें चांगलीं दिसत नाहींत!' सुंदरम् गंभीर स्वरांत म्हणाला, 'त्या होड्या सभ्य माणसांच्या नसून या भागांतल्या जंगली लोकांच्या असाव्यात असें वाटतें. न जाणो, कदाचित ते नरभक्षीहि असतील!'

'अन् तसें असलें तर काय होईल?' घाबराघुबरा झालेल्या मणीनें विचारलें.

'होणार काय?' सुंदरम् म्हणाला, 'आतां आपल्या रहाणींत आपण बदल केला पाहिजे. विस्तव पेटविणें बिलकुल बंद! आजपासून आमच्यांतल्या एकेकानें या टेकडीवर पाळीपाळीनें पहारा करायचा. इकडे तिकडे हिंडतांना फिरतांना फारच सावधगिरी बाळगायची. हत्यारें बरोबर घेतल्याशिवाय कुणीहि बाहेर पडायचें नाही. आमच्या इथल्या वास्तव्याच्या साऱ्या खाणाखुणा नष्ट करायच्या!'

'आपण इथें असल्याचें ठाऊक आहे त्यांना?' चंद्रशेखरनें विचारलें.

'ठाऊक नसावेंसें वाटतें.' सुंदरम् म्हणाला, 'हे बेट अगदींच लहान असून त्यांच्या येण्याजाण्याच्या वाटेपासून जरासें दूर आहे असें असलें, तरी ते लोक जंगली आहेत. अन् ते नरभक्षी असले, तर मग कांहीं बोलायचीच सोय नाहीं!'

त्या दिवसापासून त्या मुलांची निश्चितता संपली. त्यांनीं विस्तव पेटविणें अजिबात बंद केलें. गुंफेंत ठेवलेल्या 'उमराव' स्टोव्हवर अन्न शिजूं लागलें. खाणेंपिणें दिवसाउजेडीं होऊं लागलें. बरेच दिवस कष्ट काढून त्यांनीं व्हेलच्या खोपडीपासून तेल तयार केलें होतें. त्या तेलावर रात्रीं दिवा पेटत असे; पण आतां ते मुलगे अंधारांत रात्र काढूं लागले. त्यांनीं आपलें गाणेंबजावणें अजिबात बंद केलें.

'जंगली लोकांशीं लढतांना गलोलीचा कांहींच उपयोग नाहीं.' सुंदरम् सांगूं लागला, 'धनुष्यबाणांचा उपयोग होतो; पण तो दूरच्या लढाईंत. जंगली लोकांचें जवळचें आक्रमण फारच भयंकर असतें; म्हणून आपल्याला जास्तींत जास्त भाले तयार करावे लागतील. गदा हें त्यांच्याकडचें भयंकर शस्त्र आहे, म्हणून आपल्यालाहि तशी गदा बनवावी लागेल!'

'गदा कशी बनवायची?' रामप्रसादानें विचारलें.

'एक गुळगुळीत वाटोळा दगड घेऊन तो जाडजूड दंडुक्याच्या टोंकाला कातड्याच्या वादीनें घट्ट बांधला, कीं झाली गदा तयार!' सुंदरम्नें त्यांना आपली युक्ति सांगितली.

तयारी चालू झाली. झोंपडी, होडी नि कुंभकर्णाच्या म्हशीचें घमेलें, हीं झांकण्यासाठीं त्यांच्याभोंवतीं जंगली वेली नि लौकर उगवणारीं रोपटीं रोवण्यांत आलीं. तीं पावसाळ्यांत वेगानें वाढतील नि सारा संसार झांकून टाकतील असें सुंदरम्नें सांगितलें. वेळींप्रसंगीं ज्या गुंफेंत लपून रहातां येण्यासारखें होतें, त्या मंडपेश्वर गुंफेंत त्यांनीं आस्ते आस्ते आपलें अधिकांश सामानसुमान नेऊन ठेवलें नि ते पुढच्या कामाला लागले.

रोज सूर्योदयापूर्वीं पाळीपाळीनें दोन मुलगे आपलें खाणेंपिणें नि गदा, बाण, भाले इत्यादि शस्त्रें बनविण्याचें सामान-

सुमान बरोबर घेऊन टेकडीच्या पठारावर जात असत. तिथेंच त्यांचें खाणेंपिणेंहि होई नि चांदण्या रात्रीं ते तिथेंच झोंपत असत.

थोडयाच दिवसांत त्यांना धोक्याचा सराव झाला नि त्याबरोबरच त्यांची भीतीची भावनाहि कमी झाली. बाकी शिल्लक राहिली ती फक्त सावधगिरी.

पाऊस केव्हां पडेल त्याचा आतां नेम नव्हता. मधून मधून पावसाळी वारा सुटत असे नि आकाशांत ढगांचीहि हालचाल होत असे.

'आतां आपण थोडीशी ढिलाई केली पाहिजे.' सुंदरम् म्हणाला, 'अजिबात गाफील रहातां उपयोगी नाहीं; तथापि वादळापावसांतून ते जंगली लोक इथें येतील असें मला वाटत नाहीं!'

टेकडीवरचा पहारा बंद करण्यांत आला. चोहों बाजूंनीं उभारलेल्या तट्टयांच्या आंत असलेल्या झोंपडींत बसून ते मुलगे आपापलें काम करूं लागलें.

'जंगली लोकांच्या त्या होडया ये-जा कशासाठीं कर-तात?' चंद्रशेखरनें विचारलें.

'मी त्या होडयांची हालचाल नीट न्याहाळली आहे!' सुंदरम् सांगूं लागला, 'या भागांतील जंगली लोकांच्या दोन टोळया असाव्यात अन् त्यांचें आपापसांत हाडवैर असावें असें मला वाटतें. जी एकटी दुकटी होडी इकडून तिकडे जाते, ती टेहळणी करण्यासाठीं जाते; पण दोन्ही बाजूंच्या वीसपंचवीस होडयांच्यांत दोनदां सागरसमर घडल्याचें मीं पाहिलें आहे. आतां चारपांच महिने दोन्ही बाजूंच्या टोळया शांत रहातील. जंगली लोकांच्या युद्धनियमानुसार पावसाळयांत लढाई बंद असते!'

आतां भर पावसाळा चालू होता. झोंपड्याच्या आसपास लावलेल्या वेली इतक्या वाढल्या होत्या कीं, त्यांच्या आंत मडपेश्वर महाल नामक मानवी निवासस्थान आहे, असें कुणालाहि सांगतां येणें शक्य झालें नसतें.

अन् तो पावसाळा तरी कसा ? आपल्या देशांतल्या कोणत्याहि इसमाला त्याची कल्पनाहि करतां आली नसती. जणुं आकाश फाटलें आहे असें वाटत होतें. पावसाला एकदां सुरवात झाली, कीं तो आठ–आठ दिवस ओसरत नसे अन् सोबत मळभटी !

एक दिवशीं ते चौघेहि मुलगे आपल्या झोंपड्यांत गप्पागोष्टी करीत बसले होते. चार दिवसांच्या कोंडमाऱ्यामुळें ते कंटाळून गेले होते; पण तितक्यांत चोहोंकडे डोळे दिपविणारा बैंगणी रंगाचा प्रकाश पडला नि नंतर कानांचे पडदे फाटण्याइतक्या जोराची मेघगर्जना झाली.

'कुठेंतरी वीज पडली असावी !' मणि म्हणाला.

'आमच्या झोंपड्यावर पडली नाहीं तें बरें झालें.' रामप्रसाद म्हणाला, 'ती पडली असती, तर आम्ही चौघेहि सरळ वैकुंठाला गेलों असतों ! आमच्यांतला एकहि कुणी खांदा द्यायला वांचला नसता !'

सुंदरम्नें सक्त सूचना केली, तरीहि त्या मुलांना आपली उत्सुकता आवरतां आली नाहीं. वीज कुठें पडली तें पहाण्यासाठीं ते मुसळधार पावसांतून धांवत सुटले.

त्यांच्या झोंपड्यापासून सुमारें शंभर पावलांवर एक जुनेंपुराणें वडाचें झाड होतें नि त्या झाडावर ती वीज पडली होती. त्या झाडाची एक भलीमोठी फांदी अर्धवट जळून गेली होती.



पावसाच्या पाण्यामुळें आग विझली होती हें त्या मुलांचें सुदैव ! शेंकडों पक्षी मेले होते नि ते खालीं कोसळून पडले होते.

पंधरा सोळा दिवसांनंतर दुसरी दुर्घटना घडली.

दोन दिवस पाऊस ओसरला होता. आकाशांतले ढग विरून गेले होते अन् थोडा वेळ ऊनहि पडलें होतें !

झोंपड्यापासून जवळच असलेल्या वाड्यांत चंद्रशेखर नि रामप्रसाद असे दोघेजण बसले होते नि ते बकऱ्या दुभवीत होते. दुभवतां दुभवतां आपण झोपाळ्यावर बसून झोके घेत आहोंत असें त्यांना वाटलें. ते घाबरेघुबरे झाले नि इकडे तिकडे पाहूं लागले. बकऱ्या नि त्यांचीं पोरें हीं बुझालीं नि चोहोंकडे विखु-रलीं. जंगलांतलीं कित्येक झाडें धडाधड कोसळून पडलीं. जवळची जमीन दुभंगली नि तिच्या दोन फूट रुंदीच्या चिरींतून गंधका-सारखें कांहींतरी बाहेर पडूं लागलें ! तितक्यांत मणि नि सुंदरम् हेहि तिथें जाऊन पोहोंचले अन् तितक्यांतच गगनभेदी आवाज झाला नि टेकडीवरचा एक भलामोठा खडक गडगडत खालीं आल्यावर तो त्या मुलांपासून थोड्या अंतरावर स्थिरावला. दोन

बकऱ्या नि त्यांचीं तीन पोरें त्या दगडाखालीं चिरडून मेलीं !

'भूकंप !' सुंदरम् गंभीर स्वरांत म्हणाला.

तिघेहि मुलगे थरथरां कांपत होते.

'फार मोठें नुकसान झालें नाहीं, ही त्या गुंफेंतल्या मंडपेश्वराची कृपा !' सुंदरम् म्हणाला, 'पण हो, आमचा तो मंडपेश्वर-महाल तिरकसला आहे. आंत असलेल्या कोणत्या सामानाची कितीशी नासधूस झाली आहे कुणास ठाऊक !'

'चल, पाहून येऊं !' असें म्हणून मणि पुढें जाऊं लागला, तोंच सुंदरम्नें त्याच्या हाताला धरून त्याला मागें ओढलें.

'भकंपाचे बहुधा दोनवेळां हादरे बसत असतात !' सुंदरम् म्हणाला, 'थांब थोडा वेळ.'

अन् खरोखरीच त्यानंतर थोड्याच वेळानें एकामागून एक असे अनेक हलके हादरे बसल्याचा अनुभव त्या मुलांना आला.

ते आपल्या झोंपड्यापाशीं गेले नि त्यांनीं पाहिलें, तों तें झोंपडे पूर्वेकडे झुकल्याचें त्यांना दिसलें. त्यांनीं जमिनींत पुरलेले वांसे उखडले होते नि ते बाजूला पडले होते.

तिथें गेल्यावर ते अगोदर झोंपड्याच्या छपरावर चढले नि छपरावरचे दगड त्यांनीं खालीं फेकून दिले. छपरावरचा भार कमी झाल्यावर त्या चौघांनीं मिळून तें झोंपडें सरळ उभें केलें नि त्याला मेढी लावल्या. त्यानंतर उखडलेले वांसे त्यांनीं पुन्हां खळ-ग्यांत घट्ट उभे केले.

फुटणारें तुटणारें असें कोणतेंच सामान त्या झोंपड्यांत नव्हतेंच मुळीं. नाहीं म्हणायला गुंफेंत असलेल्या मडक्यांपैकीं कांहीं मडक्या फुटल्या होत्या नि त्यांच्यांतलें तेल जमिनीवर पस-रलें होतें. सुदैवानें त्यांचा 'उमराव' स्टोव्ह त्या अपघातांतून

वांचला होता. त्याला जरासुद्धां दुखापत झाली नव्हती. मंडपेश्वराची कृपा होती त्याच्यावर !

त्यांनीं दुसऱ्या दिवशीं झऱ्याच्या मागील बाजूस असलेल्या टेकाडावर जाऊन पाहिलें. तिथें त्यांचें कांहीं नुकसान झालें नव्हतें. नाहीं म्हणायला कुंभकर्णाच्या म्हशीचें जें भलेंमोठें घमेलें होतें, त्याच्यांतलें थोडेंसें तेल डुचमळल्यामुळें वाहून गेलें होतें, तेवढेंच काय तें नुकसान. बाकीचें सारें शाबूत होतें !

साऱ्या व्यापांतून निश्चिंत झाल्यावर तिसऱ्या दिवशीं ते निघेहि मुलगे आपल्या झोंपड्यांत येऊन दाखल झाले. त्यानंतर ते तिथेंच झोंपले. त्यांना गाढ झोंप लागली.

✦ ✦

# अकरा

म्हणतां म्हणतां पावसाळा संपला. पावसामुळें त्या मुलांना झोंपड्यांत अडकून पडावें लागत असे; तथापि त्या काळांत जंगली लोकांच्या आक्रमणाचा संभव नव्हता, म्हणून ते मुलगे बेफिकीर बनले होते. आतां आकाश निरभ्र झालें होतें नि ऊनहि पडलें होतें; पण त्याबरोबरच जंगली लोकांच्या आक्रमणाची भीतीहि वाढली होती.

तथापि दुसऱ्या एका बाबतींत स्थित्यंतर घडलें होतें. ते मुलगे त्या बेटावर आल्याला एक वर्ष लोटलें होतें. सुंदरम् नि रामप्रसाद हे दोघे पहिल्यापासूनच प्रौढ नि समजूतदार होते. मणिभाई नि चंद्रशेखर हे त्या बेटावर आले, त्यावेळीं ते अनुक्रमें बारा नि तेरा वर्षांचे कोवळे पोरगे होते; पण तिथलें रहाणें सवरणें नि तिथल्या जीवनाची जिम्मेदारी या दोन कारणांमुळें ते दोघेहि आपल्या देशांतल्या बावीस वर्षांच्या तरुणांपेक्षांहि प्रौढ बनले होते. त्यांची प्रकृतीहि धडधाकट होती. सुंदरम्वर बाकीच्या

तिघांहि मुलांचा विश्वास होता नि त्याच्या नेतृत्वाखालीं त्यांचे दिवस मजेंत जात होते.

त्या टेकडीच्या माथ्यावर एकेक मुलगा रोज पहाऱ्यासाठीं पाळीपाळीनें उभा रहात असे. पहारा बंद पडला नव्हता. तो सावधगिरीसाठीं सतत चालूं होता.

अशा प्रकारें कांहीं महिने निघून गेले. त्या अवधींत कांहींच घडलें नव्हतें, म्हणून ते मुलगे बेफिकीर बनले होते; पण एक दिवशीं पहाऱ्यावर असलेल्या रामप्रसादनें झोंपड्यांत परत आल्यावर बाकीच्या तिघांना एक बातमी सांगितली तो म्हणाला, ' पहाऱ्यावर असतां सारा दिवस कांहीं होड्या पूर्वेकडून पश्चिमेकडे जात असल्याचें मी माझ्या डोळ्यांनीं पहात होतों. त्या होड्या साठसत्तरांहून कमी नव्हत्या. किंबहुना कांहीं जास्तच असतील !'

चांदणी रात्र होती, म्हणून सुंदरम् नि मणि असे दोघे पहाऱ्यावर निघून गेले. त्यांना नीटसें दिसलें नाहीं; तथापि कांहीं होड्या पश्चिमेकडे गेल्याचें त्यांनीं पाहिलें.

दुसऱ्या दिवशीं कित्येक होड्या पश्चिमेकडून पूर्वेकडे पळत आहेत नि पश्चिमेकडच्या होड्या त्यांचा पाठलाग करीत आहेत असें त्या मुलांना दिसून आलें. अस्तमानापर्यंत दोन्ही पक्षांत जलयुद्ध चालूं होतें नि कित्येक होड्या बुडाल्या होत्या, तेंहि त्यांनीं पाहिलें होतें !

ते ज्या गोष्टीला भीत होते, ती गोष्ट तिसऱ्या दिवशीं त्यांच्या डोळ्यांसमोर घडली ! माऱ्यांतून वांचलेल्या पूर्वेकडील जंगली लोकांच्या होड्या पूर्वेकडे पळत होत्या नि पश्चिमेकडील होड्या त्यांचा पाठलाग करीत होत्या.

अन् ज्या बेटावर त्या चौघां मुलांचें वास्तव्य होतें, त्या बेटाकडे दोन्ही पक्षांच्या होडया येत होत्या. पळणाऱ्या नि पाठलाग करणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या होडया होत्या त्या !

'पूर्ववाल्यांनीं पश्चिमवाल्यांवर चढाई केली होती; पण अखेर ते हरल्यामुळें पश्चिमवाले त्यांचा पाठलाग करीत आहेत. कदाचित् दोन्ही पक्षांचे लोक इथें येतील नि पुन्हां परस्परांशीं लढूं लागतील !' सुंदरम् सांगूं लागला, 'आपण आपलें सारें सामान झऱ्यामागच्या गुंफेंत नेऊन ठेवलें पाहिजे नि साऱ्या साधनांनिशीं सज्ज राहिलें पाहिजे !'

मंडपेश्वरमहालांत विशेषसें सामान नव्हतें, म्हणून तें दुसरीकडे उचलून न्यायला वेळ लागला नाहीं. बकऱ्या नि त्यांचीं पोरें होतीं. त्या मुलांनीं त्यांना रानांत नेऊन सोडून दिलें नि ते पुढें काय घडतें, तें मोठ्या उत्सुकतेनें पाहूं लागले.

सूर्यास्ताच्या सुमारास त्या सातहि होडया त्या बेटाच्या किनाऱ्यानजीक आल्या; पण त्या पळपुटया होडयांचा पाठलाग करणारे जंगली लोक कच्च्या गुरूचे चेले नव्हते कांहीं ! तेहि तितकेच पक्के होते ! पळपुटे लोक समुद्रांतून किनाऱ्यावर उतरण्यापूर्वींच पाठलाग करणारे लोक तिथें येऊन पोहोंचले नि नंतर गुढघाभर पाण्यांत त्या दोन्ही पक्षांतील लोकांचें संगर सुरू झालें. अगदीं घनघोर सागरसंगर चालू झालें.

पळपुटे लोक होते एकवीस नि त्यांचा पाठलाग करणारे लोक होते छत्तीस ! दोन्ही पक्षांच्या लोकांकडे पाषाणी गदा नि टोंकदार लांकडी भाले हीं हत्यारें होतीं. ते दोन्ही पक्षांतले लोक भयानक आरोळया ठोकीत एकमेकांशीं भिडले ! तें जलयुद्ध अर्धा तासच चाललें. त्यांच्यांतले चार पळपुटे तिथें मरून पडले नि बाकीचे जंगलांत पळून गेले.

त्या जलयुद्धांतले विजयी लोक मोठ्यानें आरडत ओरडत नाचूं लागले. मेलेल्या लोकांचे मुडदे त्यांनीं किनाऱ्यावर ओढून आणले अन् त्यानंतर ते जंगलांतलीं लांकडे नि पालापाचोळा हीं गोळा करूं लागले.

ते चौघेहि मुलगे झाडींत लपून तें रोमांचक दृश्य पहात होते. त्या काळकुटया जंगली लोकांनीं आपल्या डोक्यांवर कोणत्यातरी पक्ष्यांच्या पांढऱ्या पिसांचे टोप चढविले होते अन् त्यांनीं आपल्या अंगावर गेरू नि चुना या दोन साधनांच्याद्वारें तऱ्हेतऱ्हेचीं चित्रें रेखाटलीं होतीं.

त्या लोकांची चपळाई खरोखरच वाखाणण्यासारखी होती. अल्पावधींतच त्यांनीं कित्येक भारे लांकडें पालापाचोळा हीं जंगलांतून जमा करून आणलीं.

त्यानंतर ते सारे किनाऱ्यावर बैठक मारून बसल्यावर त्यांच्यांतल्या दोघांनीं लांकडांपासून अग्नि प्रज्वलित करण्याच्या प्रयोगाला सुरवात केली. यज्ञकर्माच्या आरंभीं ज्या प्रकारचा काष्ठाग्नि प्रयोग करतात, त्याच प्रकारचा प्रयोग होता तो! फक्त त्या प्रयोगाच्यावेळीं ते मंत्रोच्चार करीत नव्हते इतकेंच काय तें! काष्ठघर्षणसमयीं त्यांनीं दर्भाच्या दोरीऐवजीं चामड्याची वादी वापरली होती हें विशेष! ते जंगली लोक तपोवनांतले ऋत्विज ऋषि नव्हते कांहीं!

पहातां पहातां त्या लांकडांतून ठिणग्या बाहेर पडूं लागल्या नि त्यानंतर पंधराच मिनिटांत त्याच्यांतून धुराचे लोट निघूं लागले. म्हणतां म्हणतां सरण तयार झालें!!

चोहोंकडे प्रकाश पसरला नि त्या प्रकाशामुळ झाडींत लपून बसलेल्या चौघांहि मुलांना ते जंगली लोक करीत असलेलें क्रिया-

कर्मांतर स्पष्ट दिसूं लागलें. त्या बिचाऱ्या मुलांनीं तसलें तें दृश्य पूर्वी कधींच पाहिलें नव्हतें.

लांकडें पेटतीं झाल्यावर त्यांच्यांतले कांहीं लोक उठले, किनाऱ्यावर गेले नि त्यांनीं तिथून चार होड्या ओढून आणल्या. प्रत्येक होडींत पळपुट्या माणसाचा एकेक मुडदा होता. त्या होड्या त्यांनीं सरणावर चढविल्या.

'मेलेल्या माणसाला भडाग्नि देताहेत !' मणि तोंडांतल्या तोंडांत पुटपुटला.

'कसचा भडाग्नि अन् कसचा मंत्राग्नि मणि ? अरे, आपण आगींत मासे भाजतों ना ? त्याप्रमाणें ते लोक त्या सरणावर माणसांचे मुडदे भाजताहेत !' रामप्रसाद म्हणाला.

'ते माणसांचें मांस खाणार कीं काय ?' चंद्रशेखरानें विचारलें.

'नाहीं तर काय ?' सुंदरम् म्हणाला, 'नरमांसभक्षीच आहेत ते !'

तितक्यांत कांहीं लोकांनीं किनाऱ्यावरच्या होडींतल्या एका स्त्रीला ओढीत ओढीत तिथें आणलें. तिला आणीत असतां ती स्त्री किंचाळत होती.

सरणापाशीं आणल्यावर तिला ओढीत आणणाऱ्या लोकांना त्यांच्यांतल्याच एका इसमानें दटावलें. त्यानें दटावतांच त्यांनीं तिला परत किनाऱ्यावर नेलें नि होडींत बसविलें.

त्यांना दटावणारा तो माणूस अंगानें चांगला औरसचौरस होता नि तो त्या लोकांचा पुढारी असावा असें वाटत होतें.

'त्यांनीं कांहीं जिवंत कैदीहि आणले आहेत नि त्या कैद्यांत बायकाहि आहेत.' रामप्रसाद म्हणाला.

'त्या स्त्रीला त्यांनीं परत कां पाठविलें ?' मणीनें विचारलें.

'उद्यां सकाळच्या न्याहारीसाठीं कांहींतरी राखून ठेवलें पाहिजे ना ! त्यांनीं जर तसें केलें नाहीं, तर उद्यां ते खाणार काय माती ?' चंद्रशेखर म्हणाला.

सरणांतल्या आगीच्या ज्वाळा आतां मंदावल्या होत्या; तथापि त्या लोकांच्या हालचाली अस्पष्टशा दिसत होत्या.

त्यांनीं सरणांत भाजलेलीं ती चारहि मढीं ओढीत ओढीत जराशीं दूर नेलीं नि नाचगाणीं करतां करतां ते त्या मुडद्यांच्या मांसावर बकासुरासारखे तुटून पडले ! त्यांच्या नाच गाण्यांच्या तीव्रतेवरून त्यांनीं आपल्यासोबत गांवठी दारूच्या बाटल्या आणल्या होत्या, असें अनुमान करायला मुळींच हरकत नव्हती !

'हा एकंदर प्रकार चीड आणणारा आहे !' मणि म्हणाला, 'असला प्रकार आपण स्वस्थ बसून पहायचा का ?'

'तर मग आपण काय करायचें असें म्हणणें आहे तुझें ?' रामप्रसाद म्हणाला, 'आम्हांला काय करतां येणार ? आम्ही कांहींतरी हालचाल केली, तर ते लोक आम्हांला जिवंत जाळतील नि आमच्या मांसावर गिधाडांसारखे तुटून पडतील !'

'त्या होड्यांत जे कैदी आहेत, त्यांचेहि उद्यां असेच हाल व्हायचे !' मणि दुःखी स्वरांत म्हणाला.

'सुंदरम्‌दादा, आम्हांला दुसरें कांहीं करतां येण्यासारखें नसलें, तरी होड्यांत अडकून पडलेल्या त्या कैद्यांची सुटका करतां येईल !'

'सुटका करून काय फायदा ? तेहि नरमांसभक्षीच आहेत. पिंजऱ्यांत अडकून पडलेल्या एका वाघाला एका दयाळु ब्राह्मणानें पिंजऱ्यांतून सोडविलें होतें; पण आपली सुटका होतांच तो कृतघ्न वाघ, त्या उपकारकर्त्या ब्राह्मणाला मारून टाकायला तयार झाला, असें मीं लहानपणीं एका गोष्टींच्या पुस्तकांत-

वाचल्याचें मला आठवतें. आपण जर त्या कैद्यांची सुटका केली, तर आमचीहि अवस्था त्या दयाळु ब्राह्मणासारखीच होणार !' — सुंदरम्नें सांगितलें.

'संकटांत सांपडलेल्यांना सहाय्य करणें हें आपलें कर्तव्यच आहे मुळीं !' चंद्रशेखर म्हणाला, 'निदान त्यांचा जीव वांचविल्याचें आम्हांला समाधान तरी मिळेल असें मला वाटतें !'

'तूं म्हणतोस तें बरोबर;' सुंदरम् म्हणाला, 'पण मी तुझ्यापेक्षां चार पावसाळे जास्त काढले आहेत या दुनियेंत ! तुम्हां सर्वांना संकटांत सांपडूं न देणें हें माझेंहि कर्तव्यच आहे !'

'नको दादा ! आपण त्या साऱ्या कैद्यांची सुटका करूंया !' तिघेहि एकदमच म्हणाले, 'अन् त्यानंतर आमच्यावर जर कांहीं आपत्ति आली, तर पुढचें पहातां येईल आपल्याला !'

'तुम्हां तिघांचीहि अशीच अपेक्षा आहे का ?' सुंदरम्नें त्यांना विचारलें.

'होय !' तिघेहि एकदमच म्हणाले.

'मणि नि रामप्रसाद,' सुंदरम् म्हणाला, 'तुम्ही दोघेहि इथेंच थांबा अन् तुम्हांला जर कुणी जंगली माणूस त्या होड्यांकडे जात असल्याचें दिसलें, तर वेळ न गमावतां शिट्टी वाजवून मला सावध करा ! रामप्रसाद, तूं चल माझ्यासोबत.'

समुद्रकिनाऱ्यावर दाट काळोख होता.

ते दोघेहि लपतछपत चालूं लागले नि थोड्याच वेळांत त्या होड्यांपाशीं जाऊन पोहोंचले.

बाकीच्या साऱ्या होड्या रिकाम्या होत्या; पण एका होडींत रानवेलींनीं बांधून टाकलेलीं सहा माणसें होतीं नि तीं सारीं आपल्या आयुष्याच्या अखेरच्या घटका मोजीत होतीं ! त्यांची अगतिक अवस्था झाली होती.

सुंदरम् आश्चर्यचकित झाला ! तो त्यांचीं बंधनें तोडूं लागला; पण त्यावेळीं एकाहि माणसानें हर्षध्वनि केला नाहीं नि शंखध्वनीहि केला नाहीं ! सुंदरम्‌नें एकेका माणसाला बंधनांतून सोडविलें नि त्या प्रत्येकाला समुद्रकांठावर नेऊन उभें केलें.

सुंदरम्‌नें सर्वांची सुटका केल्यावर त्यानें त्यांना आपल्या मागून चालत येण्याची सूचना केली नि तो मोठ्या सावधगिरीनें जंगलांत जाऊं लागला.



ते सारे त्याच्या मागून चालत जात होते; पण ते थोडेंसें अंतर चालून गेल्यावर त्यांना कुठूनसा कुजबुजण्याचा आवाज ऐकूं आला, म्हणतांक्षणींच ते सारे भेकड नि पळपुटे लोक जंगलांत घुसले नि पहातां पहातां अदृश्य झाले.

सुंदरम् नि चंद्रशेखर हे दोघेहि पूर्वी लपून बसलेल्या जागीं परत आले.

‘ विलक्षणच आहेत ते लोक ’ चंद्रशेखर म्हणाला ! ‘ आम्ही त्यांना मोठ्या संकटांतून सोडविलें; पण त्यांनीं आभाराचा एक शब्दहि तोंडावाटे काढला नाहीं !’

'फारच चांगलें झालें !' सुंदरम् म्हणाला, 'अंधार असल्यामुळें त्यांनी आम्हांला ओळखलें नाहीं. ते आम्हांला आपले साथीदारच समजले. बाकी आम्ही मात्र सुदैवी खरे ! दोन्ही पक्षांतील लोकांना आम्ही इथें असल्याची जाणीव झाली नाहीं !'

'आतां पुढें काय ? आतां आपण आपल्या मंडपेश्वर महालांत जाऊन स्वस्थ झोंपूंया का ?' मणीनें सुंदरम्‌ला विचारलें

'थोडा वेळ थांब.' सुंदरम् त्याला म्हणाला, 'आतां कांहीं धोका नसला, तरीहि आपण सावध राहिलें पाहिजे. उजाडल्यावर आपण जाऊंया इथून. त्या लोकांच्या हालचालींकडे लक्ष देणें आत्याचें आहे !'

त्या विजयी वनवीरां(?)ची हालचाल आतां पूर्णतः बंद पडली होती.

पोटभर नरमांस भक्षण केल्यावर नि यथेच्छ मद्य प्राशन केल्यावर ते आतां बेहोष होऊन पडले होते !

त्या सरणांतले विझत चाललेले निखारे अंधारांत जरासे चमकत होते; पण बाकी सगळीकडे सारें सामसूम होतें !

सुमारें तास दोन तास झाडींत लपून बसलेले ते चौघेहि मुलगे आतां आपल्या मंडपेश्वर महालांत जाणार होते; पण तितक्यांतच त्यांना जंगलांत कसलीतरी गडबड चालत असल्याची चाहूल लागली.

जंगलांतून अकस्मात बाहेर पडलेल्या पळपुट्या जंगली लोकांनीं दारूच्या नशेंत बेहोष होऊन पडलेल्या त्या विजयी वनवीरां(?)वर निकराचा हल्ला केला नि त्याचवेळीं ते मोठ्यानें आरडूं ओरडूं लागले.

अंधार असल्यामुळें पुढें काय झालें तें त्या चौघांहि मुलांना

कळलें नाहीं; पण त्या लोकांचा चालू असलेला कोलाहल त्यांना बराच वेळ ऐकूं येत होता.

त्यानंतर थोड्या वेळानें उजाडलें नि कोलाहलहि पुरता थांबला.

त्या मुलांनीं बराच वेळ वाट पाहिली; पण एकाहि जंगली माणसाची ये–जा त्यांना दिसली नाहीं.

अन् दिसणार कशी ?

लढाई थांबल्यावर विजयी झालेले आक्रमक हातभट्टीचा बेवडा पिऊन बेहोष पडले होते! उरलेल्यांपैकीं कांहीं मरून पडले होते नि कांहीं घायाळ होऊन पालथे पडले होते!

'आतां आपल्याला मुळींच धोका नाहीं! त्यांची नशा इतक्यांत उतरणार नाहीं!' सुंदरम् त्या तिघांनाहि म्हणाला, 'आपण आतां समुद्रकिनाऱ्यावर जाऊंया अन् प्रातर्विधी उरकून परत येऊंया! पुढचें पुढें पहातां येईल आपल्याला!'

चौघे मुलगे समुद्रकिनाऱ्यावर गेले.

अन् त्याच वेळीं त्यांच्या गुंफेतल्या मंडपेश्वरानेंहि त्यांच्यावर कृपा केली! त्यांना संकटांतून सुटण्याचा मार्ग दाखवून दिला!

समुद्रांतून प्रवास करीत असलेलें एक गलबत त्या मुलांना दिसलें!

विचारांत वेळ न गमावतां ते चौघेहि समुद्रकांठीं असलेल्या एका होडींत बसले नि ती होडी त्यांनीं गलबताच्या दिशेनें हाकाली. होडी चालू झाल्यावर फडकें हलवून ते गलबताच्या कप्तानाला गलबत थांबविण्याचा इशारा करूं लागले!

कप्तानानें गलबताचा नांगर स[illegible] सोडला नि गलबत

थोड्याच वेळांत त्यांची होडी गलबताला भिडली !

गलबतावरच्या लोकांनीं त्या संकटग्रस्त मुलांना आपल्या गलबतावर घेतल्यानंतर तें गलबत पुढच्या मार्गाला लागलें !

गलबत मार्गस्थ होण्यापूर्वीं त्या मुलांनीं त्या बेटाचें 'सिंधु-द्वीप' असें नामकरण केलें !

कांहीं दिवसांनंतर ते चौघेहि मुलगे मच्छलीपट्टण बंदरांत सुखरूपपणें उतरले नि एकमेकांचा निरोप घेतल्यावर ते आपापल्या घरीं निघून गेले !

## समाप्त

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ...... दिनांक .....
विषय क्र. .....
BVBK-0400942